मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २२५ ■ रविवार, २६ एप्रिल २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## संक्षिप्त

### ई–मेल च्या कारणावरून लोखंडी रॉडने केली मारहाण

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : एकाला ई-मेल आला आणि दुसऱ्याला आला नाही यावरून हुज्जत घालून लोखंडी रॉडने मारहाण केल्या प्रकरणी आरोपी खाजा चांद शेख (राहणार सेक्टर आठ कळंबोली) याच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात 23 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. श्रीराम हरी मुंडे हे तळोजा एमआयडीसी येथे गाडी भरण्यासाठी कंपनीच्या गेटवर जाऊन कंपनीच्या ई-मेलची वाट पाहत होते. यावेळी श्रीराम यांच्या ओळखीचे खाजा चांद शेख (वय 25) हे गाडी भरण्यासाठी त्या ठिकाणी हजर असताना श्रीराम यांना ई-मेल आला आणि आरोपीला ई-मेल आला नाही यावरून आरोपी याने श्रीराम यांच्यासोबत हूज्जत घातली आणि त्याच्या तीन मित्रांना बोलावून आरोपी याने श्रीराम यांना लोखंडी रॉडने उजव्या हातावर, पायावर मारून जखमी केले.

### डोक्यावर व हातावर कुकर मारून महिलेला केले जखमी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पानवेल वार्ताहर : डो**क्यावर आणि हातावर कुकर मारून महिलेला जखमी केल्याप्रकरणी दोघांविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात 25 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. 28 वर्षीय महिला यांना त्यांचे दिर दिनेश मोरया आणि सासरे लाला मोरया यांनी त्या मुलांसह नोकरी करण्यासाठी घर सोडून लखनऊ, उत्तर प्रदेश या ठिकाणी जात असल्याच्याकारणावरून आणि इतर कारणांवरून भांडण केले आणि महिलेला आणि त्यांच्या पतीला शिवीगाळ आणि लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच घरातील कुकर महिलेच्या डोक्यात मारून त्यांना जखमी केले. यावेळी त्या स्वतःचा बचाव करत असताना त्यांच्या दोन्ही हातावर कुकर मारला आणि त्यांची हाताची बोटे फ्रॅक्चर झाली.

### अत्याचार करून लग्न करण्यास दिला नकार

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर अत्याचार केल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात आरोपी शिवाजी श्रीमंत वाघमोडे (राहणार सेक्टर 25, कामोठे) याच्या विरोधात 24 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. 7 फेब्रुवारी ते 13 फेब्रुवारी या दरम्यान आरोपीने पीडित महिलेला लग्न करणार आहे असे खोटे सांगितले आणि तिच्यासोबत जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. त्यानंतर पिडीतेने लग्नाविषयी वेळोवेळी विचारणा केली असता त्याने लग्न करण्यास नकार दिला. त्यामुळे आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.


# नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातर्फे भारतातील पहिली अत्याधुनिक कंटेनराइज्ड इनडोअर शूटिंग रेंज सुरु




**दैनिक युवक आधार**

**पनवेल / केवल महाडिक** : नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाने कळंबोली येथे मुख्यालयात भारतातील पहिली पूर्णत: सुसज्ज कंटेनरयुक्त इनडोअर शूटिंग रेंज कार्यान्वित केली आहे, ज्यामुळे पोलीस कर्मचारी आणि परवानाधारक बंदुकधारकांना सुरक्षितपणे सराव करता येईल. याबाबत माहिती देताना नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे म्हणाले की हे शूटिंग रेंज पथदर्शी प्रकल्प प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून वर्षभर नियंत्रित शूटिंग प्रशिक्षण देतो. देशातील अशा प्रकारच्या पहिल्या उपक्रमात, नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाने





प्रायोगिक तत्वावर कळंबोली मुख्यालयात एक संपूर्ण सुसज्ज, अत्याधुनिक कंटेनर शूटिंग रेंज कार्यान्वित केली आहे, ज्यामुळे केवळ पोलीस कर्मचाऱ्यांनाच नव्हे तर परवानाधारक खाजगी बंदुकधारकांना देखील नियंत्रित वातावरणात सराव करता येतो. संरक्षण प्रशिक्षण पायाभूत सुविधांसाठी ओळखल्या जाणाऱ्या ठाणे जिल्ह्यातील मुरबाडस्थित कंपनी मॅक- ५ इनोव्हेशन्स प्रायव्हेट लिमिटेडने विकसित केलेली इनडोअर रेंज एका मोठ्या कंटेनरमध्ये बसवण्यात आली आहे आणि ती पूर्णपणे वातानुकूलित, बुलेटप्रूफ आणि ध्वनीरोधक आहे. प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून तयार केलेले, भारतातील पहिल्या पूर्ण सुसज्ज कंटेनरयुक्त इनडोअर शूटिंग रेंज म्हणून तिचे वर्णन केले जात आहे.

### उपलब्ध असलेल्या सुविधा

सदर कंटेनरीकृत शूटिंग रेंजची लांबी ३७ मीटर, रुंदी ४ मीटर आणि उंची ४ मीटर आहे आणि सरावासाठी तीन स्वतंत्र लेन आहेत. आधुनिक मानकांनुसार २०२५ मध्ये विकसित केले गेले, हे प्रमाणित बुलेट-ट्रॅपिंग सिस्टम, साउंडप्रूफिंग उपचार आणि एकात्मिक पाळत ठेवणे यंत्रणा बसवलेले आहे. सुविधेमध्ये गोळीबारानंतर गोळ्यांचे अवशेष सुरक्षितपणे गोळा करण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे आणि सराव सत्रांवर बारीक नजर ठेवण्यासाठी नियंत्रण पॅनेलचा समावेश आहे. पूर्णपणे बंदिस्त असल्याने, श्रेणी हे सुनिश्चित करते की पाऊस, उष्णता किंवा थंडी यासारख्या हवामानाचा प्रशिक्षणावर परिणाम होत नाही. मर्यादित जागेत जास्तीत जास्त तंत्रज्ञान वापरण्यासाठी सुविधा तयार करण्यात आली आहे.

### परवानाधारक बंदुक धारकांसाठी प्रवेश

अनेक खाजगी बंदुक परवानाधारकांना सरावासाठी सुरक्षित जागा शोधण्यासाठी अनेकदा संघर्ष करावा लागतो हे ओळखून पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी ही सुविधा अधिकृत नागरिकांसाठी खुली करण्यासाठी पुढाकार घेतला. वैध रिव्हॉल्व्हर किंवा पिस्तूल परवाना धारण केलेल्या व्यक्तींना विहित नियमांचे पालन केल्यानंतर हाय-टेक रेंज वापरण्याची परवानगी दिली जाईल, असे माहिती देताना शांताराम वाघमोडे या अधिकाऱ्यांनी सांगितले. ही श्रेणी प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आली आहे. यामुळे पोलिस कर्मचारी तसेच परवानाधारक खाजगी बंदुकधारकांना वर्षभर सुरक्षित आणि नियंत्रित वातावरणात अचूक नेमबाजीचा सराव करता येईल," असेहि शांताराम वाघमोडे यांनी यावेळी सांगितले.

# लिपिक ज्योती शंकर म्हात्रे प्रदीर्घ सेवा बजावून सेवानिवृत्त

## सुधागड विद्या संकुलाने केला भावपूर्ण निरोप समारंभ

**दैनिक युवक आधार**

**कळंबोली प्रतिनिधी** : कळंबोलीतील सुधागड विद्या संकुलातील हिंदी माध्यमिक विभागाच्या लिपिक ज्योति शंकर म्हात्रे यांनी या 31 वर्षाची प्रदीर्घ सेवा बजावून सेवानिवृत्त होत आहेत.त्यांच्या सेवानिवृत्तीच्या निरोप समारंभ सुधागड विद्या संकुलातील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी वर्गाने शनिवारी सुधागड संकुलातील सभागृहात आयोजित केला होता.यावेळी शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून ज्योती म्हात्रे यांना भावपूर्ण निरोप समारंभ देण्यात आला. यावेळी त्यांच्या भावी निवृत्तीच्या आयुष्याला सर्वांनी आपल्या मनोगतातून हार्दिक शुभेच्छा दिल्या.सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली विद्यालयातील हिंदी माध्यमिक विभागात कार्यरत



असलेल्या ज्योती शंकर म्हात्रे या वयाच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत.31 वर्षाची विद्यालयातील प्रदीर्घ सेवा मनोभावे आणि शिस्तप्रिय वातावरणात पूर्ण केली आहे.त्यांचा सेवानिवृत्ती निरोप समारंभ विद्या संकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे, विद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांच्या निरोप समारंभाचे आयोजन केले होते. यावेळी सुधागड एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष कै.शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी ज्योती म्हात्रे यांचा शाल श्रीफळ स्मृतीचिन्ह व भेटवस्तू देऊन विद्या संकुलाच्या वतीने यथोचित गौरव अन सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमास पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती काशिनाथ पाटील, पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक गोपाळ भगत, आमदार बाळाराम पाटील यांच्या पत्नी राजश्री पाटील, सामाजिक कार्यकर्ते स्वामी मात्रे,विद्या संकुलाचे कार्यालयीन प्रमुख वासुदेव पाटील, आर एस पी चे नवी मुंबईचे समादेशक विलास पाटील, ज्योती म्हात्रे यांचे पती उद्योजक शंकर म्हात्रे, ज्योती म्हात्रे यांचे मोठ्या संख्येने कौटुंबिक सदस्य,तसेच सामाजिक,शैक्षणिक, सांस्कृतिक,राजकीय, उद्योजक क्षेत्रातील मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते. यावेळी मनोगत व्यक्त करताना विद्या संकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे म्हणाले की ज्योती म्हात्रे यांनी केलेले विद्यालयासाठी चे शैक्षणिक कार्य हे निश्चितच आमच्या पुढील कार्यालयातील कर्मचाऱ्यांना निश्चितच प्रेरणादायी असेच आहे. हसतमुख, मितभाषी, परंतु कार्यालयीन कामकाजामध्ये वाकपदारपणा, नीटनेटकेपणा ठेवणाऱ्या त्या होत्या. त्यांच्या कामाची चुणूक ही नेहमीच सर्वच कर्मचाऱ्यांना मिळत असे. सेवानिवृत्तीनंतर त्यांचे अपुरे असणारे स्वतःचे सांप्रदायिक क्षेत्रातील व संगीत क्षेत्रातील छंद त्यांनी पुढील आयुष्यात जोपासावे.

# कन्नमवार नगरमध्ये स्पीड ब्रेकर बसविण्याची नगरसेविका सुनीता जाधव यांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी** : विक्रोळी पूर्व येथील कन्नमवार नगर परिसरात रस्त्यांच्या डांबरीकरणाचे काम सुरू असताना आवश्यक ठिकाणी स्पीड ब्रेकर बसविण्यात यावेत, अशी मागणी नगरसेविका सुनीता चंद्रशेखर जाधव यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे केली आहे.

यासंदर्भात सहाय्यक अभियंता (परिरक्षण), एस वॉर्ड, भांडुप यांना दिलेल्या निवेदनात जाधव यांनी नमूद केले आहे की, आत्माराम सुर्वे मार्ग, गजानन महाराज चौक ते रायगड चौक या प्रमुख रस्त्यांचे डांबरीकरण सुरू आहे. मात्र या कामादरम्यान परिसरातील आवश्यक ठिकाणी स्पीड ब्रेकर न बसवल्यास अपघातांची शक्यता वाढू शकते आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

निवेदनात विशेषतः आदि आरोग्यम हॉस्पिटल, म्युनिसिपल शाळा, इमारत क्रमांक ४ बी,शिवाई चौक, रायगड चौक, विक्रोळी पोलीस स्टेशन, कोर्टसमोर इमारत क्रमांक १९८, सत्यवान खोत चौक इमारत क्रमांक १४४ आदी ठिकाणी स्पीड ब्रेकर बसविण्याची मागणी करण्यात आली आहे.

सुनीता जाधव यांनी सांगितले की, या परिसरात शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णवाहिकांची मोठ्या प्रमाणावर ये-जा असते. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने या मागणीची तातडीने दखल घेऊन संबंधित ठिकाणी स्पीड ब्रेकर उभारावेत.

स्थानिक नागरिकांनीही या मागणीला पाठिंबा दर्शविला असून, पालिकेने लवकरात लवकर कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# शरयू होंडा पनवेल च्या आत्याधुनिक वर्कशॉप चे उद्घाटन सोहळा पार पडला

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : पनवेल मध्ये गेली २१ वर्ष शरयू होंडा ग्राहकांना सेवा देत असून अत्यंत पारदर्शक व सुसज्ज सेवा देण्याच्या उद्देशाने स्मार्ट वर्कशॉप बनवण्यात आले त्याचे आज शुक्रवार दिनांक 24 एप्रिल रोजी होंडा कंपनीचे "Koichi Tonouchi san" यांच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात आले

याप्रसंगी प्रमुख उपस्थिती शरयू होंडा चे डायरेक्टर



सुजीत देशमुख आणि जनरल मॅनेजर विकास कदम यांचे लाभले मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा पार पडला यावेळी शरयू होंडा पनवेल स्मार्ट वर्कशॉप ची पाहणी मान्यवरांनी केली तसेच या अत्याधुनिक वर्कशॉप मुळे ग्राहकांना अत्यंत चांगली सेवा मिळणार असून पारदर्शक सेवा मिळण्याच्या उद्देशाने या वर्कशॉप ची मांडणी केली असून ग्राहकांना आपल्या गाडीचे काम कोणत्या पद्धतीने चालू असल्याचे समोर दिसणार असून त्याचबरोबर होंडा कंपनीचा नवीन ॲपच्या आला असून या आप मुळे ग्राहकांना होंडा गाड्या ची माहिती खरेदी विक्री विषय माहिती तसेच वर्कशॉप महिती आपल्याला अपडेट मिळणार आहे. पनवेल शरयू होंडा पनवेल च्या कस्टमर केअर मॅनेजर श्वेता केदार यांनी दिली

# महाराष्ट्र केसरी भारतीय पैलवान एसीपी विजय चौधरी यांचा वाढदिवस पत्रकार मित्र असोसिएशनतर्फे साजरा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी :** प्रतिष्ठित महाराष्ट्र केसरी किताब तीन वेळा जिंकलेले भारतीय पैलवान एसीपी विजय चौधरी यांचा वाढदिवस नुकताच पत्रकार मित्र असोसिएशनतर्फे साजरा करण्यात आला तसेच विविध विषयावर यावेळी त्यांच्या कार्यालयात चर्चा करण्यात आली. यावेळी पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. एसीपी विजय चौधरी हे एक भारतीय पैलवान असून त्यांनी अत्यंत प्रतिष्ठित महाराष्ट्र केसरी किताब तीन





वेळा जिंकला आहे. त्यांनी २०१४, २०१५ आणि २०१६ मध्ये सलग तीन वेळा हा पुरस्कार जिंकला आणि नरसिंग यादव यांच्यानंतर ही कामगिरी करणारे ते दुसरे पैलवान ठरले . तसेच, २०१९ मध्ये त्यांनी झी महाराष्ट्र कुस्ती लीगच्या दिमाखदार उद्घाटन हंगामात पुणेरी पलटणला विजय मिळवून दिला. महाराष्ट्र पोलीस अकादमी नाशिक पद डीवायएसपी वर्ष २०१७-२०१८ पुणे ग्रामीण परिवीक्षा कालावधी वर्ष २०१८-२०१९ पुणे गुन्हे शाखेत एसीपी पदावर वर्ष २०१९ पासून ९ महिन्यांसाठी नियुक्ती, येरवडा विभागात एसीपी म्हणून वर्ष २०१९ पासून ४ महिन्यांसाठी, पुणे वाहतूक पोलीस विभाग, एसीपी पदस्थापना व सध्या नवी मुंबई वाहतूक विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त म्हणून ते कार्यभार पाहत आहेत अशा या व्यक्तिमत्वाचा वाढदिवस साजरा करताना पत्रकार मित्र असोसिएशनचे संस्थापक केवल महाडिक, अध्यक्ष एस. क्रिष्णकुमार, कार्याध्यक्ष नितीन जोशी, सहसचिव प्रवीण शेंडे आदी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये ‘क्रांतिज्योत Power Expo 2026’चा जल्लोष - महिलांच्या कर्तृत्वाला मिळाले नवे आकाश!

**खरेदीतून महिलांना आर्थिक बळ • ‘महिला प्रेरणा पुरस्कार 2026’ने कर्तृत्वाचा सन्मान • आमदार विक्रांतदादा पाटील यांचे मार्गदर्शन**









**दैनिक युवक आधार**
**संतोष आमले संपादक : पनवेलमध्ये आयोजित करण्यात आलेला ‘क्रांतिज्योत Power Expo 2026’ हा केवळ एक प्रदर्शन नसून महिलांच्या कर्तृत्वाचा भव्य उत्सव ठरला. महिलांनी तयार केलेल्या वस्तूंना नागरिकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे या उपक्रमाने महिला सक्षमीकरणाचा प्रभावी संदेश दिला.**

पनवेल येथे क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशनच्या वतीने आयोजित “क्रांतिज्योत Power Expo 2026” या भव्य उपक्रमाने महिलांच्या कर्तृत्वाला नवे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. विविध क्षेत्रातील महिलांनी स्वतःच्या हाताने तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन आणि विक्री करत आपल्या कलेची छाप उमटवली.

या एक्स्पोला नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती दर्शवून महिलांच्या उत्पादनांची खरेदी केली. यामुळे महिलांना केवळ आर्थिक आधारच मिळाला नाही, तर त्यांच्या आत्मविश्वासातही मोठी भर पडली. “आपला छोटासा सहभागही महिलांच्या स्वप्नांना नवी उभारी देऊ शकतो”, हा संदेश या उपक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला.

क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशनच्या संस्थापक सौ. रूपालीताई शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक कार्य, पत्रकारिता आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रात त्यांचे योगदान उल्लेखनीय असून, त्यांच्या पुढाकारामुळे अनेक महिलांना स्वतःची ओळख निर्माण करण्याची संधी मिळत आहे.

यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना “क्रांतिज्योत महिला प्रेरणा पुरस्कार 2026” देऊन गौरविण्यात आले. संघर्षातून यश मिळवणाऱ्या महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान करताना सभागृहात प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाला सन्माननीय आमदार विक्रांतदादा पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी महिलांना मार्गदर्शन करत सामाजिक कार्यात पुढे येण्याचे आवाहन केले. त्यांच्या प्रेरणादायी भाषणामुळे उपस्थित महिलांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.

आमदार विक्रांतदादा पाटील यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले.अत्यंत व्यस्त वेळापत्रक असूनही त्यांनी कार्यक्रमासाठी वेळ काढून केवळ उपस्थितीच लावली नाही, तर अधिक वेळ थांबून महिलांशी संवाद साधला आणि त्यांना मार्गदर्शन केले.

ते केवळ लोकप्रतिनिधी नसून एक पाठीराखा भाऊ म्हणून महिलांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशन आणि समस्त महिला परिवाराने त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

- महिलांनी बनवलेल्या वस्तूंना तुफान प्रतिसाद
- खरेदीतून महिलांना आर्थिक बळ
- ‘महिला प्रेरणा पुरस्कार 2026’ने गौरव
- आमदार विक्रांत पाटील यांचे मार्गदर्शन
- रूपाली शिंदे यांच्या पुढाकाराने महिलांना नवे व्यासपीठ

या कार्यक्रमाला पनवेल महानगरपालिकेतील विविध मान्यवर, नगरसेवक तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांमध्ये सौ. प्रमिला पाटील, सौ. स्नेहल ढमाले, ॲड. मनोज भुजबळ, सौ. मोहिनी पाटील, श्री. गणेश कडू, सौ. राजश्री वावेकर आणि कु. अस्मिता घरत, सौ नीता माळी, सौ. रेशमा जगताप यांचा समावेश होता.

पनवेलमध्ये रंगलेल्या ‘क्रांतिज्योत Power Expo 2026’ने महिलांच्या सक्षमीकरणाचा नवा अध्याय लिहिला असून, हा उपक्रम अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## पनवेल महानगरपालिकेची सर्व प्रभागात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण हटाव मोहिम

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर) :** पनवेल महानगरपालिकेमार्फत गेल्या काही दिवसापासून अतिक्रमण हटाव संदर्भात मोठ्या प्रमाणात मोहिम सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत कोणत्याही अतिक्रमणाबाबत दुर्लक्ष केले जाणार नाही. तसेच कामाबाबत कसूर करणाऱ्यांच्याबाबत गय केली जाणार नाही. अतिक्रमणाबाबत कारवाई करताना अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अत्यंत दक्षतेने, जागरूकतेने कारवाई करावी. कोणत्याही अमिषास बळी पडू नये, अन्यथा त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे निर्देशआयुक्त मंगेश चितळे यांनी दिले आहेत.गेल्या काही दिवसांपासून कामोठे, खारघर, पनवेल, कळंबोली अशा चारही प्रभागात अतिक्रमणाबाबतच्या तक्रारी, विविध माध्यमातून येत होत्या, त्यावर आळा घालण्यासाठी आयुक्तांनी कठोर कारवाईची पाऊले उचलली असून अतिक्रमण विभागात सध्या कार्यरत असलेल्या सर्व पर्यवेक्षकांना बदलले. तसेच त्यांच्या जागी अन्य विभागातील पर्यवेक्षक देण्यात आले आहेत. अतिक्रमण हटाव कामात हलगर्जीपणा केल्याचे निर्दशनास आल्याने पर्यवेक्षक प्रशांत गायकर यांना निलंबित केले आहे. अतिक्रमण विभागाच्यावतीने सध्या जोरदार कारवाई सुरू असून यात प्रामुख्याने अनधिकृत बॅनर व होर्डिंग्जवर तोडक तसेच अनधिकृत आठवडी बाजारांवरही कारवाई करण्यात आली. आठवडी बाजार बंद करण्यात आले. याचबरोबरीने फूटपाथवरील अतिक्रमणाविरोधातही कारवाई करण्यात आली आहे. खारघर येथील मोठमोठ्या हॉटेल्स बाहेरील सिमांत भागातील बांधकामांवर तोडक कारवाई करण्यात आली आहे. कामोठ्यातील नर्सरी व हातगाड्यांवर तोडक कारवाई करण्यात आली. महापालिकेमार्फत अतिक्रमण हटाव मोहिमेसाठी विशेष टास्क फोर्स तयार करण्यात येत आहे. यामध्ये 10 सुरक्षा रक्षक व 10 अतिक्रमण विभागाचे कर्मचारी असतील. तसेच रात्रीच्या वेळीही गस्त घालण्यात येणार आहे. अतिक्रमण संदर्भात विशेष दखल घेत प्रभागनिहाय महापालिका सदस्यांच्या समवेत बैठका घेऊन, त्यांच्याकडून आलेल्या सूचनांची तात्काळ दखल घेण्यात येत आहे, अशी माहिती अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे यांनी दिली आहे. अतिक्रमणाबाबत नागरिकांना कोणतीही तक्रार करावयाची असल्यास महापालिकेच्या पनवेल कनेक्ट पवर करावी, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात येत आहे.

## सिटी इंटरनॅशनल स्कूल अचानक बंद,फौजदारी व प्रशासकीय कारवाई करा - खासदार रविंद्र वायकर

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी:**ओशिवरा येथील नामांकित सिटी इंटरनॅशनल स्कूल प्रशासनाने शाळा अचानक बंद करण्याचा शाळा प्रशासनाने एकतर्फी निर्णय घेतल्यामुळे शेकडो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष धोक्यात आल्याने, शाळा प्रशासनावर फौजदारी तसेच प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणी मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राचे खासदार रविंद्र वायकर यांनी शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

ओशिवरा आणि गोरेगाव परिसरातील अनेक विद्यार्थी या शाळेत अनेक वर्षांपासून शिक्षण घेत आहेत. प्रवेशाच्या वेळी शाळा प्रशासनाने पालकांकडून ४०,००० रुपये 'देणगी' स्वरूपात स्वीकारले होते आणि इयत्ता १० वी पर्यंत विनाअडथळा शिक्षण देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, आता शाळा प्रशासनाने अचानक शाळा बंद करण्याचा निर्णय घेतल्याने विद्यार्थ्यांचे मानसिक आणि शैक्षणिक नुकसान होत असल्याचा आरोप पालकांकडून करण्यात येत आहे. शाळा सोडल्याचा दाखला देण्याऐवजी शाळा प्रशासन पालकांना ईमेलवर 'ट्रान्सफर सर्टिफिकेट' पाठवत आहे. शाळा बंद झाल्याची अधिकृत नोंद टाळण्यासाठी प्रशासन असे करत असल्याचा पालकांचा आरोप आहे. पालकांकडून घेतलेली मोठी रक्कम आणि फी यांबाबत शाळा प्रशासनाने कोणतीही स्पष्ट भूमिका घेतलेली नाही. शाळा अचानक बंद करण्याचा निर्णय शाळा प्रशासनाने घेतल्यामुळे आता या विद्यार्थ्यांना इतर शाळांमध्ये प्रवेश कसा मिळणार, असा प्रश्न पालकांसमोर उभा ठाकला आहे.या प्रश्नी पालकांनी खासदार रवींद्र वायकर यांची भेट घेतली होती. खासदार वायकर यांनी याची गंभीर दखल घेत शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांना पत्र पाठवून

शाळा प्रशासनावर तातडीने फौजदारी आणि प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, पालकांकडून घेतलेली देणगीची रक्कम व्याजासह परत करण्यात यावी, 'शिक्षण हक्क कायद्या'नुसार बाधित विद्यार्थ्यांचे तातडीने शैक्षणिक पुनर्वसन करावे, विद्यार्थ्यांना रीतसर 'शाळा सोडल्याचा दाखला' मिळवून द्यावा.शाळेच्या मनमानी कारभारामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ दिले जाणार नाही. सरकारने या प्रकरणात हस्तक्षेप करून पालकांना आणि विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा." अशी मागणी केली आहे.

## ३८ वर्षांनंतर पुन्हा एकत्र ;१९८८-८९ बॅचचा स्नेहमेळावा जल्लोषात

**दैनिक युवक आधार**
**रसायनी:(आनंद पवार) :** मोहोपाडा येथील जनता विद्यालयातील सन १९८८-८९ च्या बॅचमधील विद्यार्थी-विद्यार्थिनी तब्बल ३८ वर्षांनंतर पुन्हा एकत्र आल्याने भावनांचा ओलावा आणि आनंदाचा जल्लोष अनुभवायला मिळाला.बुधवार दि. २२ एप्रिल रोजी कृष्णाशेठ पारंगे यांच्या रिस येथील फार्महाऊसवर आयोजित स्नेहमेळावा उत्साहात पार पडला.



दीर्घ काळानंतर भेट झाल्याने प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्सुकतेचे भाव स्पष्ट दिसून येत होते.शालेय जीवनातील अभ्यास, खेळ,वार्षिक स्नेहसंमेलन आणि विविध स्पर्धांच्या आठवणींना उजाळा देत जुन्या आठवणींनी रंगत चढवली. मित्र-मैत्रिणींनी एकमेकांची आपुलकीने विचारपूस करत स्नेहबंध अधिक दृढ केले.कार्यक्रमात संगीत रजनीचे आयोजन करण्यात आले होते,

ज्यामुळे वातावरण अधिकच रंगतदार झाले.यावेळी बॅचमधील कृष्णाशेठ पारंगे यांची नुकतीच खालापूर पंचायत समितीच्या सभापतीपदी निवड झाल्याबद्दल सर्वांनी पुष्पगुच्छ व आकर्षक भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार केला आणि पुढील वाटचालीस शुभेच्छांचा वर्षाव केला.

३८ वर्षांनंतर झालेल्या या स्नेहमेळाव्याने जुन्या मैत्रीला नवसंजीवनी मिळाली असून,उपस्थित सर्वांसाठी हा क्षण अविस्मरणीय ठरला.

## मतदारांनी आपली माहिती पडताळणी करुन मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण पूर्व उपक्रमाच्या तयारीबाबत लेखी निर्देश प्राप्त झाले आहेत . त्याअनुषंगाने नागपूर जिल्हयातील 12 विधानसभा मतदार संघाअंतर्गत नियुक्त केलेले मतदान केंद्रस्तरीय अधिकारी व केंद्रस्तरीय पर्यवेक्षक यांच्या माध्यमातून मतदार यादीतील मतदारांशी मतदार मॅपींग करण्याचे काम प्रत्येक विधानसभा स्तरावर सुरू करण्यात आलेले आहे. प्रत्येक मतदाराने त्यांच्या मतदान केंद्रावरील नियुक्त केलेले मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचेशी संपर्क करुन सन 2002 च्या यादीतील मतदाराचे स्वतःचे नाव असलेला पुरावा किंवा कुटुंबातील आई, वडील, आजी आजोबा यांचे नाव तसेच सुनांनी त्यांच्या आई वडीलांची सन 2002 च्या मतदार यादीमध्ये त्यांचे नाव असल्याबाबत पुरावा देवून मॅपींग करण्यात यावे. ही मॅपिंग प्रक्रिया अत्यंत महत्वाची व अनिवार्य आहे. मॅपिंग नसल्यास आपले नाव मतदार यादीतून वगळल्या जावू शकते याची नोंद घ्यावी. त्यामुळे मतदाराने मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याशी प्रत्यक्ष भेट किंवा फोनव्दारे संपर्क साधावा. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचेकडून नागरिकांनी आपली माहिती पडताळणी करुन मॅपिंगची प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन निवडणूक शाखेकडून करण्यात आले आहे.

## के.एल.2 परिसरातील कचरा व ड्रेनेज समस्येवर तात्काळ कारवाई

**नगरसेवक रामदास शेवाळे यांचे रहिवाशांकडून आभार**


**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर) :** पनवेल महानगरपालिका प्रभाग क्रमांक 8 मधील के.एल.2 सेक्टर 5 परिसरात कचरा साचणे तसेच ड्रेनेज लाईन बंद होण्याच्या समस्येमुळे रहिवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या समस्येबाबत स्थानिक नागरिकांनी नगरसेवक रामदास शेवाळे यांच्याकडे निवेदन देऊन तक्रार नोंदवली. नागरिकांच्या अडचणीची गंभीर दखल घेत नगरसेवक शेवाळे यांनी तात्काळ पनवेल महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांशी



संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली. त्यांच्या पुढाकारामुळे प्रशासनाने कोणताही विलंब न करता के.एल.2 परिसरात स्वच्छता मोहीम राबवली तसेच ड्रेनेज लाईन दुरुस्तीचे कामही तत्काळ सुरू करण्यात आले. सध्या या भागात साफसफाई आणि ड्रेनेज दुरुस्तीची कामे वेगाने सुरू असून त्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. स्थानिक रहिवाशांनी नगरसेवक शेवाळे यांच्या तत्परतेचे कौतुक करत मनापासून आभार व्यक्त केले आहेत. या तातडीच्या कारवाईमुळे परिसरातील स्वच्छता सुधारण्यास मदत होणार असून भविष्यात अशा समस्या उद्भवू नयेत यासाठी प्रशासनाने नियमित देखरेख ठेवावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## शिवस्फूर्ती प्रगती मंडळ(गोविंदा पथक) तर्फे श्री साईनाथ महोत्सव २०२६ चे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**घाटकोपर, (केतन भोज) :** श्री साईनाथ मंदिर,रामनगर(अ),घाटकोपर(प),मुंबई-८६ येथील नावाजलेले शिवस्फूर्ती प्रगती मंडळ(गोविंदा पथक) तर्फे दरवर्षी प्रमाणे यंदा ही श्री साईनाथ महोत्सव २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे.यावेळी श्री साईनाथ उत्सवानिमित्त बुधवार दि.२९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ७.०० वाजता गीत,संकल्पना साईरत्न श्रावण बाळा(भाऊ) तसेच संगीत संयोजक अशोक दादा वायंगणकर यांच्या सुस्वर स्वराने अवघ्या महाराष्ट्राला मुक्तकंठाने गौरवलेली साई पालखी गीते(झाले तुझे दर्शन साई)मराठी हिंदी साई पालखी भजनांचा सुस्वर साई भजन सोहळा आयोजित करण्यात आले असून,दुसऱ्या दिवशी गुरुवार दि.३० एप्रिल रोजी सायंकाळी ६.०० वाजता भव्य साईपालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.आणि शेवटी शुक्रवार दि.०१ मे २०२६ रोजी सकाळी ७.०० वाजता साई




अभिषेक केला जाणार असून तद्नंतर दुपारी २.३० वाजता श्री सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली आहे.तसेच नंतर सायंकाळी ७.०० वाजता महाप्रसाद(साई भंडारा) होणार आहे.आणि शेवटी रात्री ८.३० वाजता प्रमुख अतिथी देणगीदारांचा जाहिर सत्कार सोहळा पार पडणार आहे.अशा प्रकारे तीन दिवसीय कार्यक्रम होणार आहे.तरी या भव्य श्री साईनाथ महोत्सवामध्ये सर्व साई भक्तांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष-हरेश धांद्रुत यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# शासनाला खोटे प्रतिज्ञापत्र देऊन फसवणूक करणाऱ्यांविरुद्ध 'नागरी विकास ग्राहक मंच' आक्रमक

**अप्पर जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल; दोषींवर कडक कारवाईची मागणी**



**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका :** शासकीय यंत्रणेची दिशाभूल करून आणि खोटे प्रतिज्ञापत्र (Affidavit) सादर करून शासनाची फसवणूक करणाऱ्या प्रवृत्तींविरुद्ध 'नागरी विकास ग्राहक मंच'ने आता कंबर कसली आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत मंचाच्या वतीने नागपूरचे अप्पर जिल्हाधिकारी श्री. प्रवीण महिरे यांना प्रत्यक्ष भेटून तक्रारीचे निवेदन सादर करण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, एका विशिष्ट प्रकरणात संबंधितांनी शासनासमोर वस्तुस्थिती लपवून खोटी माहिती देणारे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. हा प्रकार केवळ प्रशासनाची फसवणूक नसून कायद्याचे उघड उल्लंघन आहे. या प्रकरणाचा छडा लावून संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी 'नागरी विकास ग्राहक मंच'चे महाराष्ट्र कार्याध्यक्ष श्री. मिलिंदजी खेकाळे आणि नागपूर कार्याध्यक्ष श्री. उत्तमजी सालवणकर यांनी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

'जागो ग्राहक जागो' हा मंत्र जपत ग्राहकांच्या हक्कासाठी लढणारा हा मंच आता प्रशासकीय पारदर्शकतेसाठीही सक्रिय झाला आहे. खोट्या कागदपत्रांच्या आधारे सरकारी लाभ लाटणे किंवा प्रशासनाची दिशाभूल करणे यांमुळे सामान्य नागरिकांच्या हक्कांवर गदा येते, अशी भूमिका मंचाच्या वतीने मांडण्यात आली.

अप्पर जिल्हाधिकारी श्री. प्रवीण महिरे यांनी तक्रारीची दखल घेत या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आश्वासन दिले आहे. या तक्रार निवारण वेळी मंचाचे अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. प्रशासकीय स्तरावर या तक्रारीनंतर आता काय कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# दैवी शक्तीचा ढोंग करून अत्याचार; धारणगावचा भोंदू गजाआड

**दैनिक युवक आधार निफाड**

**राजेश भडांगे तालुका प्रतिनिधी :** निफाड तालुक्यातील धारणगाव (खडक) येथे स्वतःला 'महाराज' म्हणवून घेत दैवी शक्तीच्या नावाखाली एका २८ वर्षीय विवाहित महिलेचे लैंगिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी महेशगिरी उर्फ महेश दिलीप काकडे (वय ३१) याला लासलगाव पोलिसांनी अटक केली असून, निफाड प्रथमवर्ग न्यायालयाने त्याला दि.२९ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीविरुद्ध बलात्कारासह महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कौटुंबिक वाद व मानसिक तणावामुळे पीडित महिला अस्वस्थ होती. याच परिस्थितीचा गैरफायदा घेत तिच्या कुटुंबीयांनी तिला धारणगाव येथील 'प्रतिगाणगापूर' मठात नेले. तेथे आरोपीने स्वतःमध्ये दैवी शक्ती असल्याचा बनाव करत महिलेला 'बाधा' असल्याचे सांगितले.

धार्मिक विधीच्या बहाण्याने आरोपीने महिलेचा मोबाईल क्रमांक घेतला आणि त्यानंतर आक्षेपार्ह संदेश पाठवत मानसिक छळ सुरू केला. दि.२३ ऑगस्ट २०२४ रोजी आरोपीने पीडितेला नाशिक येथे बोलावले. तेथून तिला त्र्यंबकेश्वर रोडवरील एका लॉजवर नेऊन "माझ्याकडे दैवी शक्ती आहे, तू विरोध करू शकणार नाहीस," अशी भीती दाखवत तिच्यावर बळजबरीने बलात्कार केला.

यानंतर आरोपीने तिचे विवस्त्र छायाचित्रे काढून ती व्हायरल करण्याची धमकी दिली. तसेच, पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने तिच्या मोबाईलमधील संदेशही डिलीट करण्यात आले. आरोपीच्या सततच्या धमक्यांमुळे पीडित महिला व तिचे कुटुंब तक्रार करण्यास घाबरत होते.

मात्र, सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने पीडितेला धीर मिळाला आणि तिने लासलगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीला अटक केली.

आरोपीला प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती एस.एस. सुक्रे यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले. सरकारी अभियोक्ता मनोज तोरणे यांनी गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस कोठडीची मागणी केली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपीला दि.२९ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

या प्रकरणात आणखी काही महिलांची फसवणूक किंवा लैंगिक शोषण झाले असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली असून, तपासादरम्यान आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता आहे.या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# गॅस एजन्सीकडून ग्राहकांसाठी शेड व पिण्याच्या पाण्याची झाली सुविधा - जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांचे निर्देश

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** उष्णतेच्या लाटेमुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ नये यासाठी गॅस ग्राहकांना शुद्ध पिण्याच्या पाण्याची व सावलीची व्यवस्था गॅस एजन्सीमार्फत त्यांच्या कार्यालयात असणे आवश्यक आहे. कोणत्याही ग्राहकांना उन्हात थांबावे लागू नये याची काळजी घेण्याचे निर्देश सर्व गॅस एजन्सी चालकांना जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष कुमार आशीर्वाद यांनी दिले होते. या निर्देशान्वये आता गॅस एजन्सीमार्फत ग्राहकांना योग्य त्या सुविधा पुरविल्या जात आहेत.






शेड व सावलीची व्यवस्था : गॅस वितरण केंद्रावर येणाऱ्या नागरिकांसाठी गॅस एजन्सींनी तातडीने शेडची व्यवस्था करणे आवश्यक आहे. आता ही व्यवस्था होत असल्यामुळे भरउन्हात उभे राहणाऱ्या ग्राहकांचे उष्माघातापासून संरक्षण होत आहे.

स्वच्छ पिण्याच्या पाण्याचे नियोजन

प्रत्येक केंद्रावर ग्राहकांसाठी पुरेसे आणि स्वच्छ पिण्याचे पाणी गॅस एजन्सीजने उपलब्ध करून देणे आवश्यक. त्यानुसार शहर व ग्रामीण भागातील केंद्रांवर ही सुविधा दिली जात आहे.

शिस्तबद्ध वितरण व वेळेचे व्यवस्थापन

केंद्रांवरील गर्दी टाळण्यासाठी वितरणाची प्रक्रिया अधिक सुटसुटीत आणि वेळेचे चोख नियोजन करून राबवण्यावर जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी भर दिला आहे. तालुका स्तरावर निरीक्षण अधिकारी तसेच नागपूर (शहर) येथे परिमंडळ अधिकाऱ्यांमार्फत याचे संनियंत्रण केले जात आहे. यामुळे अपवादात्मक परिस्थिती वगळता सर्व गॅस एजन्सीज खबरदारी घेत आहेत.

ग्राहकांना मिळाला दिलासा

जिल्ह्यातील गॅस पुरवठा व त्याचे गॅस एजन्सीमार्फत सुरळीत वितरण होण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद हे स्वत: दररोज आढावा घेत आहेत. यातील येणाऱ्या अडचणी या गॅस कंपनी व एजन्सी यांच्या परस्पर समन्वयातून सुटल्या जाव्यात यावर प्राधान्य दिल्याने आता वितरणात सुरळीतपणा आला आहे. गॅसच्या वितरणासह या आढावा बैठकांमधून ग्राहकांच्या हक्काचे रक्षण व त्याबाबत एजन्सीमार्फत काळजी घेण्याला प्राधान्य देण्याचे स्पष्ट निर्देश दिल्यामुळे यात ग्राहकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील खेळाडू तेजस्विनी चौधरीचा गौरव



**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे :** संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या क्रीडा विभागातील कुशल खेळाडू तथा B.Sc. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी कु. तेजस्विनी चौधरी हिची मुंबई लोहमार्ग पोलिस दलात निवड झाल्याबद्दल महाविद्यालयात तिचा व तिच्या वडिलांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार सर,डॉ. अंभोरे सर,क्रीडा विभाग प्रमुख डॉ.निलेश गाडेकर,डॉ. गणेश मिसाळ, प्रा. अश्विनी काळे,सुनील साळुंखे,सुनील वाघ आदी मान्यवर उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी तेजस्विनीच्या यशाबद्दल अभिनंदन करून तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.तिच्या या यशामुळे महाविद्यालयाचा गौरव वाढला असून इतर विद्यार्थ्यांसाठीही ती प्रेरणादायी ठरली आहे.

# जागतिक वसुंधरा दिनानिमित्त संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात कार्यक्रम उत्साहात"

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे :** संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथील भूगोल विभागातर्फे जागतिक वसुंधरा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा व प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. शिरीष पवार हे उपस्थित होते.प्रमुख मार्गदर्शक म्हणून वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.डॉ.निलेश गावडे यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व, वाढते प्रदूषण आणि शाश्वत विकास याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी "वसुंधरा ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, तिचे संरक्षण करणे ही काळाची गरज आहे," असे प्रतिपादन केले.कार्यक्रमामध्ये पर्यावरण



संवर्धन, वृक्षारोपण आणि स्वच्छता याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांद्वारे वसुंधरेच्या रक्षणाचा संदेश दिला.या कार्यक्रमाचे आयोजन भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ. शत्रुघ्न उद्धव भोरे, तसेच प्रा. डॉ. पंकज शिंदे यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निचपुर गावच्या शिरपेचात एक मानाचा तुरा

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूरगड प्रतिनिधी/ सय्यद ईसा :** काल माननीय प्रा. गोविंद केंद्रे सर यांची छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सभागृह नेतेपदी झालेली निवड ही केवळ त्यांच्या कुटुंबासाठीच नव्हे, तर संपूर्ण किनवट तालुक्यातील जनतेच्या अभिमानाचा, आणि गौरवास्पदाचा क्षण आहे.

निचपुरसारख्या छोट्याशा खेड्यातून छत्रपती संभाजीनगरसारख्या मोठ्या शहरापर्यंतचा त्यांचा प्रवास नक्कीच सोपा नसेल. आज दिसणाऱ्या या यशामागे अनेक कडु-गोड अनुभव, अविरत संघर्ष, आणि त्यांनी केलेले भक्कम संघटनात्मक काम दडलेले आहे. एका सर्वसामान्य कुटुंबात जन्म घेऊन, कुठलाही राजकीय वारसा



नसताना, नोकरी सांभाळत एवढं मोठं यश मिळवणं हे खरोखरच कौतुकास्पद आहे.

दोन दिवसा पासून सोशल मीडियावर छत्रपती संभाजीनगरमधील अनेक मान्यवरांनी प्रा. केंद्रे सरांच्या कार्यपद्धतीचे केलेले कौतुक पाहायला मिळाले. कुठलीही पार्श्वभूमी नसताना एवढ्या मोठ्या शहरात आपल्या कार्याचा, आणि विचारांचा, ठसा उमटविणे हे अप्रूप वाटण्यासारखे आहे. माननीय कॅबिनेट मंत्री श्री. अतुल सावे साहेब, डॉ. भागवत कराड साहेब, तसेच त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी सराप्रती व्यक्त केलेल्या भावना हे त्यांच्या गेल्या २५-३० वर्षांच्या कार्याची पावती आहे.

५७ नगरसेवकांच्या चमूमधून सभागृह नेते म्हणून झालेली सरांची निवड आपल्या किनवट तसेच संपूर्ण पंचक्रोशीसाठी अभिमानाची गोष्ट आहे. संभाजीनगर सारख्या मोठ्या शहरात राहूनही केंद्रे सराची आपल्या निचपुर गावाप्रती ओढ कायम असल्याचे आपण पाहतो. सध्याच्या काळात "राजकारण वंगाळ आहे" असे मत व्यक्त होत असतानाच, किनवटसारख्या आदिवासी भागातून येऊन स्वतःच्या कर्तृत्वावर ओळख निर्माण करणाऱ्या व्यक्तीची सभागृह नेतेपदी निवड होणे हे चांगल्या माणसांसाठीही राजकारणात आजही स्थान आहे, याचे सकारात्मक उदाहरण आहे.

# सुरगाणा महाविद्यालयात लोकनेते व्यंकटराव हिरे जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरगाणा येथे प्राचार्य डॉ.चंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे संस्थापक लोकनेते व्यंकटराव हिरे यांची ९७ जयंती साजरी करण्यात आली .

प्राचार्य डॉ.दिघावकर यांच्या हस्ते लोकनेते व्यंकटराव हिरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना




ते म्हणाले की, सार्वजनिक जीवनात वावरताना समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत ज्ञान दाणाचे पवित्र कार्य करणाऱ्यात हिरे घराणं आजही अग्रेसर आहे. सहकार आणि शिक्षण क्षेत्रात नावाजलेले लोकनेते त्यांनी समाजकार्याचा वारसा पुढे नेण्यासाठी महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात सहकार,कृषी विभागात राज्यमंत्री म्हणून काम केले. गोर गरीब जनतेसाठी विद्यार्थ्यांसाठी ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षण ते उच्च महाविद्यालयीन शिक्षणाचा मार्ग मोकळा केला आहे असे सांगितले.

यावेळी कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विजय अहिरे, डॉ.चंद्रकांत पाटील,प्रा. सुरेश भोये,प्रा. विनायक बागुल,प्रा.भगवान महाले,प्रा. संजय महाजन,प्रा. बाळू धुम,प्रा.केशव गावित, प्रा. कृष्णा गांगोडे, डॉ.माधुरी गावित, वर्षा जोशी,प्रमीला धुम, गिरीधर भालेराव, रोशन पवार, ओमकार धुम,नाना कोर यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारीसह विद्यार्थी उपस्थित होते.

# मालेगावच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही – आ. श्रीजया चव्हाण

**दैनिक युवक आधार**

**अर्धापूर प्रतिनिधी अरविंद पांचाळ :** "कै. डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या काळापासून मालेगावशी आमच्या कुटुंबाचे जिव्हाळ्याचे ऋणानुबंध आहेत. मी मालेगावची भूमिपुत्र असून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही," अशी ग्वाही भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्रीजया चव्हाण यांनी दिली.

मालेगाव येथे विविध विकास कामांच्या लोकार्पण



सोहळ्यात त्या बोलत होत्या. यावेळी त्यांच्या हस्ते जिल्हा वार्षिक विकास योजनेअंतर्गत मास्टर कॉलनी येथील अंगणवाडी इमारतीचे लोकार्पण करण्यात आले. तसेच पुरातन रामलिंग महादेव मंदिराच्या सभागृहासाठी मंजूर २४ लाख ६० हजार रुपयांच्या निधीतून उभारण्यात येणाऱ्या बांधकामाचे भूमिपूजनही करण्यात आले.

कार्यक्रमास सरपंच मारोती बुट्टे, माजी सरपंच अनिल इंगोले, उपसरपंच मनोहर खंदारे, भाऊराव चव्हाण सहकारी कारखान्याचे संचालक बळवंत पाटील, भाजपा युवा तालुकाध्यक्ष पवन पाटील, भाजपा तालुकाध्यक्ष बालाजी गव्हाणे, महिलाध्यक्ष मंगला स्वामी, संगीता कोल्हे, सुनील अटकोरे, कृष्णा इंगोले, सुनील मिरजकर, हिरामण वाघमारे, डॉ. जीवन जोशी, डॉ. बाळासाहेब बंडेवार तसेच ग्राम विकास अधिकारी सुरेश पत्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

# महिलांच्या आरोग्य सुरक्षेसाठी सौ. ममता प्रितम म्हात्रे सक्रिय पनवेलमध्ये कर्करोग प्रतिबंध मोहिमेला वेग

**दैनिक युवक आधार**

**खांदा कॉलनी प्रतिनिधी :** पनवेल महानगरपालिका हद्दीत सामान्य कर्करोगांचे पूर्व-तपासणी, लवकर निदान, प्रतिबंध व जनजागृती कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी टाटा मेमोरियल सेंटर, मुंबई व पनवेल महानगरपालिका यांच्यात विशेष करार करण्यात आलेला आहे. या कराराअंतर्गत आरोग्य यंत्रणा बळकट करणे, आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण व समुदाय स्तरावर कर्करोग तपासणी सेवा सक्षम करणे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर टाटा मेमोरियल सेंटर, मुंबई (प्रिव्हेंटिव्ह ऑन्कोलॉजी सर्व्हिसेस, खोपोली) व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने "सामान्य कर्करोगांचे प्रतिबंध, नियंत्रण व लवकर निदान" या विषयावर एएनएम व स्टाफ नर्सेससाठी दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा दोन टप्प्यांत यशस्वीरीत्या पार पडली.ही कार्यशाळा दिनांक २५ व २७ मार्च तसेच १६ व १७ एप्रिल २०२६ रोजी सिडको समाज केंद्र, कामोठे येथे आयोजित करण्यात आली होती. एकूण १२० नर्सेस व आरोग्य कर्मचाऱ्यांनी यात सक्रिय सहभाग घेतला.

कार्यशाळेमध्ये स्तन, गर्भाशय मुख (सर्व्हिकल) व तोंडाचा (ओरल) कर्करोग यांचे प्रमाण, जोखमीचे घटक, लक्षणे, तपासणी पद्धती व प्रतिबंधात्मक उपाय याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच एचपीव्ही डीएनए चाचणी, पॅप स्मीअर, VIA तपासणी यांचे प्रात्यक्षिक सत्र घेण्यात आले. स्तन स्वयं-परीक्षण, तोंडाच्या कर्करोग तपासणी, तंबाखू निर्मूलन समुपदेशन व जनजागृती यावरही भर देण्यात आला.




कार्यशाळेच्या शेवटच्या दिवशी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सौ. ममता प्रितम म्हात्रे यांनी महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्यासह कार्यशाळेला भेट दिली. यावेळी त्यांनी आशा सेविका व नर्सेस यांच्याशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व प्रशिक्षणाचा आढावा घेतला.

> "महिलांचे आरोग्य हे समाजाच्या सुदृढ भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. महिला व बालकल्याण विभागाच्या माध्यमातून आम्ही प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, लवकर निदान आणि जनजागृती यावर आधारित उपक्रम प्रभावीपणे राबवत आहोत. प्रत्येक महिलेला वेळेवर तपासणी व योग्य मार्गदर्शन मिळावे, हा आमचा मुख्य उद्देश आहे."
>
> **सौ. ममता प्रितम म्हात्रे**
> **महिला-बालकल्याण समिती**
> **पनवेल महानगरपालिका**

त्यांनी पुढे नमूद केले की, केंद्र व राज्य सरकार महिला आरोग्य, सक्षमीकरण व प्रतिबंधात्मक आरोग्यसेवांवर विशेष भर देत असून त्याच धोरणाच्या अनुषंगाने पनवेल महानगरपालिका प्रभावीपणे कार्य करत आहे.

यापूर्वी आशा कार्यकर्त्यांचेही प्रशिक्षण घेण्यात आले असून आता प्रशिक्षित नर्सेस व आशा सेविकांच्या संयुक्त प्रयत्नातून नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र (UPHC) स्तरावर कर्करोग तपासणी शिबिरे अधिक प्रभावीपणे आयोजित करण्यात येणार आहेत.

पनवेल महानगरपालिका सर्व नागरिकांना आवाहन करते की, या तपासणी शिबिरांमध्ये सहभागी होऊन आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी.

कार्यशाळेतील सहभागी नर्सेसनी या प्रशिक्षणामुळे कर्करोगाच्या लवकर निदानाचे महत्त्व अधिक स्पष्ट झाल्याचे सांगितले व समुदायामध्ये जनजागृतीसाठी सक्रिय भूमिका निभावण्याचा निर्धार व्यक्त केला.

पनवेल महानगरपालिका भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे नागरिकांच्या आरोग्य संवर्धनासाठी कटिबद्ध राहील.

# नागझिरा–नवेगाव व्याघ्र प्रकल्पात १ मेपासून 'मुरदोली गेट' सुरू; पर्यटकांसाठी वर्षभर जंगल सफारीची सुविधा

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी :** गोंदिया जिल्ह्यातील नागझिरा–नवेगाव व्याघ्र प्रकल्प (एनएनटीआर) मध्ये जंगल सफारीसाठी येणाऱ्या पर्यटकांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. गोंदिया–कोहमारा मार्गावरील मुरदोली येथील नवीन प्रवेशद्वार (मुरदोली गेट) येत्या १ मेपासून पर्यटकांसाठी खुले करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, हे गेट वर्षभर सुरू राहणार असल्याने पर्यटकांना सर्व हंगामात जंगल सफारीचा आनंद घेता येणार आहे.

वनविभागाच्या या निर्णयामुळे प्रकल्पातील पर्यटन व्यवस्थेत मोठी भर पडणार असून, वाढत्या पर्यटकसंख्येला नियोजनबद्ध पद्धतीने हाताळणे सोपे होणार आहे. मुरदोली परिसरात अलीकडेच वनकर्मचारी व स्थानिक कामगारांना एकाच वेळी तीन वाघांचे दर्शन झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या गेटमार्गे सफारी करणाऱ्या पर्यटकांना वाघांचे दर्शन होण्याची शक्यता अधिक असल्याने उत्सुकता वाढली आहे.



वनविभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, मुरदोली गेटवर सुरुवातीला सुमारे १० जिप्सी (सफारी वाहने) उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. याशिवाय, पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशिक्षित गार्ड व मार्गदर्शकांची नियुक्ती केली जाणार आहे. पुढील काही दिवसांत आणखी तीन नवीन गेट सुरू करण्याचीही योजना वनविभागाने आखली आहे.

नागझिरा–नवेगाव व्याघ्र प्रकल्प हा सुमारे १५० किमीच्या कोअर झोनमध्ये विस्तारलेला असून, येथे वनसंवर्धन व वन्यजीव संरक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर यंत्रणा कार्यरत आहे. प्रकल्पात ७२ पोचिंग कॅम्प स्थापन करण्यात आले असून प्रत्येक कॅम्पवर दोन मजूर असे एकूण १४४ मजूर कार्यरत आहेत. तसेच १६ नाक्यांवर प्रत्येकी तीन मजूर अशा एकूण ४८ जणांना रोजगार मिळतो. याशिवाय ९ वायरलेस कॅम्पवर २० ते २५ कर्मचारी कार्यरत आहेत.

सध्या प्रकल्पात एकूण ६८ जिप्सी वाहनांच्या माध्यमातून सफारीची सुविधा उपलब्ध आहे. मुरदोली गेट सुरू झाल्यानंतर येथेही १० जिप्सी व आवश्यक मनुष्यबळाची नियुक्ती होणार असून, स्थानिकांना रोजगारात प्राधान्य दिले जाणार आहे. त्यामुळे या भागातील युवकांसाठी रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होणार आहेत.

या संदर्भात वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, "मुरदोली गेट सुरू केल्यामुळे पर्यटकांचा अनुभव अधिक समृद्ध होईल.

तसेच स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी निर्माण करून पर्यटन आणि संवर्धन यांचा समतोल राखण्याचा प्रयत्न केला जात आहे."

एकूणच, मुरदोली गेटच्या सुरूवातीमुळे नागझिरा–नवेगाव व्याघ्र प्रकल्पातील पर्यटनाला चालना मिळणार असून, वन्यजीवप्रेमी आणि पर्यटकांसाठी हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

# भाजपा हा बकासूर! 'आप' फुटीवर संजय राऊत यांचा हल्लाबोल

**मुंबई :** आम आदमी पार्टी (आप) पक्षातील सात राज्यसभा खासदार भाजपामध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर खासदार संजय राऊत यांनी भाजपावर जोरदार टीका केली. महाभारतात बकासूर नावाचा राक्षस होता, त्याचे कधी पोट भरत नव्हते. तशीच भाजपा झाली आहे. बकासूराने पुन्हा जन्म घेतला असेल, तर तो भाजपाच्या रूपाने, असा घणाघात राऊत यांनी केला.राऊत म्हणाले, भाजपा निर्लज्ज झाली असून भाजपाने लाज सोडली आहे. भाजपाचं डंम्पिंग ग्राऊंड झालं आहे. देशात घाण पसरवण्याचं काम हे लोक करत आहेत, अशी बोचरी टीकाही त्यांनी केली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प भारताला नरक म्हणाले




होते, ते आता का म्हणाले हे समजलं ना? भारताला नरक बनवण्याचं काम भाजपानेच केलं, असा टोलाही त्यांनी लगावला.आपमधील फुटीवर बोलताना राऊत म्हणाले, पंजाबमधून राज्यसभेवर गेलेले सात खासदार होलसेलमध्ये भाजपामध्ये जात आहेत. कालपर्यंत राघव चड्ढा आणि इतर नेते भाजपाला गुंडांचा, भ्रष्ट लोकांचा पक्ष म्हणत होते. मग आता अचानक ते गुंडांच्या पक्षात कसे गेले? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. राघव चड्ढा, संजय मित्तल, संजय पाठक यांचा उल्लेख करत राऊत म्हणाले, आपने संजय मित्तल यांना राज्यसभेत पक्षाचा उपनेता केलं, तेव्हा ते आनंदी होते. मग अचानक काही संस्थांवर ईडीची कारवाई झाली, छापे पडले आणि राजकीय भूकंप झाला. या घडामोडींमागे दबावाचं राजकारण असल्याचं सूचक विधानही त्यांनी केलं. भाजपाकडून विरोधकांवर दबाव आणला जात असल्याचा आरोप करत राऊत म्हणाले, आमच्यावरही प्रयत्न झाले. मला अटक झाली, पक्ष सोडा असं सांगितलं, पण मी पक्ष सोडला नाही. आम्ही रस्त्यावरचे लोक आहोत, आमचं काय वाकडं करणार? ज्यांच्याकडे जास्त संपत्ती आहे ते घाबरतात, कारण त्यांना संरक्षण हवं असतं, असा टोला त्यांनी फुटीर खासदारांना लगावला.

# साकोली येथे बुद्ध पौर्णिमेनिमित्त भव्य प्रबोधनात्मक कार्यक्रम (कव्वाली) चे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे/साकोली :** स्वाभिमानी सामाजिक संघटना "भीम सेना " यांच्या वतीने बुद्ध पौर्णिमेनिमित्त साकोली येथे भव्य प्रबोधनात्मक कार्यक्रम (कव्वाली ) चे आयोजन करण्यात आले आहे. समाजात स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम घेण्यात येत आहे. या कार्यक्रमात राष्ट्रीय प्रबोधनकार (कव्वाल ) म्हणून नागपूर येथील श्री. प्रकाशनाथ पाटणकर हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. त्यांच्या प्रभावी आणि सुरेल व तडफदार आवाजाने समाजातील विविध प्रश्नांवर प्रकाश टाकला जाणार आहे.

हा कार्यक्रम शुक्रवार दिनांक १ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता होमगार्ड परेड ग्राउंड, साकोली येथे पार पडणार आहे.




कार्यक्रमाचे उद्घाटन मा. श्री. नानाभाऊ पटोले (आमदार, साकोली विधानसभा क्षेत्र) यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी मा. श्री. सुनीलभाऊ कुंडे (अध्यक्ष, भंडारा जिल्हा मध्यवर्ती बँक) राहणार आहेत. तसेच सहउद्घाटक म्हणून मा. श्री. डॉ. प्रशांतजी पडोळे (खासदार, भंडारा-गोंदिया) उपस्थित राहणार आहेत.

यावेळी विशेष अतिथी म्हणून मा. श्री. सोमदत्तजी कऱ्जेकर तसेच विचारमंचावर इंजी. सचिनजी गजभिये व मा. सुमितजी सहारे सर उपस्थित राहून आपले विचार मांडणार आहेत.बुद्धांच्या विचारांचा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठी हा कार्यक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार असून परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संपूर्ण बुद्ध विहार कमिटी साकोली तालुका, समता सैनिक दल साकोली तालुका, सक्षम फाउंडेशन साकोली, छत्रपती ग्रुपचा सहभाग लाभला आहे.

# दाभड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती मंडळात महिलांचे वर्चस्व

**दैनिक युवक आधार अर्धापूर**

**प्रतिनिधी अरविंद पांचाळ :** अर्धापूर तालुक्यातील दाभड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त स्थापन करण्यात आलेल्या जयंती मंडळात यंदा महिलांचे ठळक वर्चस्व पाहायला मिळाले. मंडळातील सर्व पदांवर महिलांची बिनविरोध निवड होऊन महिला सक्षमीकरणाचा आदर्श घालून दिला आहे. अध्यक्षपदी ज्योती संतोष सूर्यवंशी, तर सचिवपदी ममता अविनाश सूर्यवंशी यांची निवड करण्यात आली आहे.

यासोबतच उपाध्यक्षपदी लक्ष्मीबाई प्रकाश सूर्यवंशी, तर कोषाध्यक्षपदी आम्रपाली गिरीश सूर्यवंशी यांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.





**अध्यक्षपदी ज्योती संतोष सुर्यवंशी, सचिवपदी ममता अविनाश सुर्यवंशी याची बिनविरोध निवड**

सदस्य म्हणून पुढील महिलांची निवड करण्यात आली आहे :

विमलबाई केशव सूर्यवंशी, विमलबाई राजू सूर्यवंशी, आम्रपाली गंगाधर सूर्यवंशी, शोभा बालाजी सूर्यवंशी, नेहा खानोजी सूर्यवंशी, शांताबाई पांडुरंग सूर्यवंशी, लक्ष्मीबाई बेगाजी खंडागळे, सुमनबाई चांदोजी नरवाडे, सुजाता संजय सूर्यवंशी, जयश्री वैजनाथ सूर्यवंशी, लक्ष्मीबाई मुकुंदराव पाईकराव, सोयराबाई मोहनराव सावते, सरस्वतीबाई जळबाजी खंडागळे .दरवर्षीप्रमाणे याही वर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती २८ एप्रिल रोजी उत्साहात साजरी करण्याचे ठरविण्यात आले आहे. सकाळी ९ वाजता पंचरंगी ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात येणार असून, त्यानंतर लेझीमच्या तालावर वाजत-गाजत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम, प्रबोधनपर कार्यक्रम तसेच सांस्कृतिक सादरीकरणे आयोजित करण्यात येणार असून, युवक व महिलांचा मोठा सहभाग अपेक्षित आहे. गावात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे. या कार्यक्रमास दाभड व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून जयंती सोहळा यशस्वी करावा, असे आवाहन जयंती मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# मृणमयी सुरोशे चा गणित ऑलिंपियाडमध्ये सलग दुसऱ्या वर्षी गोल्ड मेडल – महागावात सत्कार

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव : (यवतमाळ ) :** येथील मातोश्री शिक्षण संकुलात मृण्मयी मनोज सुरोशे हिने गणित ऑलिंपियाड स्पर्धेत सलग दुसऱ्या वर्षी गोल्ड मेडल मिळवून उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल तिचा विशेष सत्कार करण्यात आला. या यशामुळे परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मातोश्री शाळेचे संस्थापक दिगंबर जगताप सर, लोकेश सर, शाळेच्या मुख्याध्यापिका गावंडे मॅडम उपस्थित होते. यावेळी शाळेतील शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मृण्मयीच्या यशाबद्दल तिचे कौतुक करताना उपस्थित मान्यवरांनी तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.मागच्या वर्षी ती स्टेट टॉपर आली होती.व गोल्ड मेडल चेक मिळाले होते.याही वर्षी मिळाले विशेष म्हणजे कोणतीही ट्यूशन न लावता स्वअभ्यास व शिक्षिका यांचे मार्गदर्शनात तिने यश मिळविले. याच कार्यक्रमात फाउंडेशन क्लासमधील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# भावपूर्ण निरोप : माध्यमशास्त्र संकुलातील विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलन सोहळा संपन्न




**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी विश्वदीप कांबळे :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत माध्यमशास्त्र संकुलात द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित निरोप समारंभ उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या दोन वर्षांच्या शैक्षणिक प्रवासातील आठवणींना उजाळा दिला. विविध सांस्कृतिक उपक्रम, भाषणे आणि अनुभव कथन यांमुळे वातावरण आनंदी तर कधी भावूक झाले. प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रामाणिकपणे काम करण्याचे मार्गदर्शन केले.

यावेळी द्वितीय वर्षातील सर्व विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून पत्रकारितेच्या क्षेत्रात पाऊल टाकण्यासाठी सज्ज झाल्याचे सांगण्यात आले. विद्यार्थ्यांनीही आपल्या मित्रपरिवाराबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, “या आठवणी आयुष्यभर सोबत राहतील,” अशी भावना व्यक्त केली.

समारोपाच्या वेळी सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

हा निरोप समारंभ सर्वांसाठीच अविस्मरणीय ठरला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माध्यम शास्त्र संकुलाचे संचालक डॉ. प्रा. सुहास पाठक तर प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. सचिन नरंगले, डॉ. प्रा. कैलास यादव, प्रा गिरीश जोंधळे हे होते...!सूत्रसंचालन कान्हा खानसोळे यांनी केले तर आभार विक्रांत हाटकर यांनी मानले...!

# मुर्तीमंत ज्ञान हेच ज्ञानेश्वर महाराजांचे स्वरूप आहे - डॉ.विक्रम सारूक महाराज

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** मनुष्य त्याला संसारातुन बाहेर पडण्याकरीता कर्म, उपासना, योग व ज्ञान हि चार साधने आहेत पण ज्ञानानेच मोक्ष मिळतो. मोक्ष मिळवणे मनुष्य जन्माचे आणि कर्तव्य आहे, ज्ञान हाच देव आहे. असे सार्थ नाव ज्ञानेश्वराचे आहे. म्हणजेच मुर्तिमंत ज्ञान हेच ज्ञानेश्वर महाराजांचे स्वरूप आहे असे प्रतिपादन ह.भ.प.डॉ.विक्रम महाराज सारूक यांनी दिनांक १९/०४/२०२६ शनिवार रोजी बीड येथील श्री संत भगवान बाबा व श्री संत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे संत भगवान बाबा, संत वामनभाऊ, संत तुकाराम महाराज, विठ्ठल -रूख्मिणी, हनुमान देवता मुर्ती प्राणप्रतिष्ठेच्या १४ व्या वर्धापन दिना निमित्त डॉ.राजेंद्र भाऊ सानप यांच्या आयोजनातुन सुरू असलेल्या वर्ष १४ व्या त्रिद्वीशीय हरिनाम




सप्ताहात पहिले किर्तन पुष्प गुंफताना. संत तुकाराम महाराजांच्या "ज्ञानियांचा राजा गुरू महाराव! म्हणती ज्ञानदेव तुम्हा ऐसे !१!या अभंगातुन ज्ञानेश्वर महाराजांचे वर्णन करताना अभंगांचे निरूपण करताना प्रतिपादन केले. पुढे बोलताना डॉ.सारूक महाराज म्हणाले की ज्ञानेश्वर महाराज हे साधकांना मोक्ष दाय आहेत. म्हणुन सर्व संतांनी त्यांचे वर्णन केलेले आहे व सर्व संत त्यांच्या कडे जातात म्हणजे ज्ञानेश्वरांचे नाव ज्ञानदेव हे सार्थ आहे. ज्ञानदेव म्हणजे ज्ञान व देव असा अर्थ आहे. त्यांच्या कडे जे ज्ञान आहे ते ज्ञाना-ज्ञानातील शुद्ध ज्ञान आहे. अज्ञानाचा लवलेश नाही ज्ञानाचे देव ते ज्ञानदेव व ते वारकऱ्यांचे देव आहेत. भक्त देवाजवळ राहतात तसे ज्ञान हे यांचे जवळ राहते. म्हणुन तर त्यांचे ज्ञान रेड्याच्या मुखात आले. मुर्तिमंत ज्ञान हे त्यांचे स्वरूप आहे, ते ज्ञान हेच देव आहे. त्यांची संगती वाचन केले तर मन पवित्र होते. परिसर पवित्र होतो विकल्प राहत नाहीत. असे संस्कार लहान मुलांना ही द्यावेत. त्यातुन ज्ञान मिळुन जीवनमान कृतार्थ होईल. श्री संत भगवान बाबा व श्री संत वामनभाऊ प्रतिष्ठानच्या माध्यमातून गेली १४ वर्ष अखंडपणे ज्ञान सोहळा आयोजीत करण्यात येतो या बद्दल आयोजक डॉ.राजेंद्र भाऊ सानप व त्यांचे सहकारी यांचे खुप खुप कौतुक असे ह.भ.प.डॉ.विक्रम महाराज सारूक यांनी किर्तन प्रसंगी म्हटले. या किर्तनास गायक म्हणून श्रीराम सानप, किशनराव माने, नामदेव मुंडे, श्रीहर्ष धांडे, वैभव येडे, आश्रुबा सानप, पवन ढाकणे, विजय वीर, राजेंद्र घोलप यांच्या सह मृदंगाचार्य अक्षय घोलप यांनी साथ संगत केली. या वेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र भाऊ सानप, ह.भ.प.दत्तात्रय महाराज मिसाळ, ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे, ह.भ.प.रामहरी रसाळ गुरूजी, ह.भ.प.बाबुराव मुंडे, एम.डी.पांचाळ गुरुजी, नागरगोजे सर, दतायत्र बांगर, आर.के.भोंडवे, ग.मा.शहाणे, किशोर नागरे, वाय.एस.भोंडवे, धनंजय सानप, उमाकांत तिडके, निलेश खेडकर, आश्रुबा नागरगोजे यांच्या सह मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते.

# रायगडला धक्का: साळाव ग्रामपंचायतीचे अहवाल गहाळ! सिस्टीमॅटिक भ्रष्टाचार ?

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** साळाव ग्रामपंचायतीतून शासकीय लेखापरीक्षण दस्तऐवज नष्ट; आर्थिक अनियमिततेचा संशय, ग्रामसेवकांवर फौजदारी गुन्हा दाखल करा! रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील साळाव ग्रामपंचायतीतून भ्रष्टाचाराच्या संशयाने दोन वर्षांचे शासकीय लेखापरीक्षण अहवाल जाणीवपूर्वक गायब केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सामाजिक कार्यकर्ते प्रमोद शंकर नागोठणेकर यांच्या तक्रारीने हा मुद्दा जिल्हाभरात खळबळ माजवली असून, *ग्रामपंचायतींच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपटले आहे*.अभिलेख गायबचा प्रकार

माहिती अधिकाराखाली नागोठणेकर यांनी साळाव ग्रामपंचायतीकडे मागील १५ वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल व ग्रामसभेचे ठराव मागितले होते. मात्र, ग्रामपंचायत कार्यालयाने सन २००४-०५ व २००५-०६ या वर्षांचे अहवाल दप्तरी उपलब्ध नसल्याचे लेखी कळवले. सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय, रायगड यांच्याकडाही या अहवालांची नोंद नसल्याचे उघड झाले. या कालावधीतील




ग्रामनिधी व विविध योजनांतील खर्चाचा तपशील या अहवालांत असल्याने आर्थिक अनियमितता व निधी अपहाराची शक्यता नाकारता येत नाही.हे अहवाल सार्वजनिक दस्तऐवज असून, त्यांचे जतन ग्रामसेवक व अधिकाऱ्यांची कायदेशीर जबाबदारी आहे. असे अभिलेख गहाळ होणे हे महाराष्ट्र अभिलेख अधिनियम २००५ च्या कलम ७ व ९ चे उल्लंघन असून, फौजदारी गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे.

**जबाबदार व्यक्तीवर कारवाईची मागणी**

नागोठणेकर यांनी तत्कालीन ग्रामसेवक दिलीप महादेव तुरे व जगन्नाथ चांगू चवरकर, तसेच जनमाहिती अधिकारी वि.सु. फासे यांच्यावर जबाबदारी निश्चित करून रेवदंडा पोलीस ठाण्यात व लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे गुन्हा नोंदवण्याची मागणी केली आहे. तक्रारीत मुंबई उच्च न्यायालयाच्या 'विवेक कुलकर्णी विरुद्ध महाराष्ट्र राज्य' निर्णयाचा उल्लेख करत 'अभिलेख उपलब्ध नाहीत' हे कारण ग्राह्य धरता येत नसल्याचे स्पष्ट केले. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम ७६१(७) अंतर्गतही कारवाईची मागणी.

***प्रशासनाची भूमिका व इशारा***

या प्रकरणात गुन्हा तात्काळ नोंदवला गेला नाही तर पोलीस अधीक्षक व न्यायालयात दाद मागण्याचा इशारा नागोठणेकर यांनी दिला आहे. रायगड जिल्ह्यात अशा प्रकाराने अभिलेख नष्ट करणे ही सिस्टीमॅटिक भ्रष्टाचाराची सुरुवात असल्याचे मत व्यक्त होत आहे. ग्रामविकास विभागाच्या शासन पत्रानुसार अभिलेख सुस्थितीत ठेवणे व परिरक्षण अनिवार्य असून, जिल्ह्यातील इतर ग्रामपंचायतींमध्येही तपास व्हावा. या प्रकरणाने रायगड जिल्ह्यातील नागरिकांमध्ये भ्रष्टाचाराविरुद्ध जागृती निर्माण झाली असून, प्रशासनाने तातडीने कारवाई करावी अशी मागणी वाढत आहे

# खालापूर तालुक्यात आरोग्य उपकेंद्रांची दयनीय अवस्था उघड
## जीव धोक्यात घालून सुरू सेवा,तातडीच्या उपाययोजनांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**रसायनी प्रतिनिधी :** रीस,मोहपाडा व वासांबे येथील आरोग्य उपकेंद्रांमध्ये भेडसावत असलेल्या गंभीर अडचणी व धोकादायक परिस्थितीमुळे आरोग्य व्यवस्थेचा पाया हादरल्याचे वास्तव समोर आले आहे. अलीकडेच खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे व जिल्हा परिषद सदस्या नेहा पारंगे यांच्या दौऱ्यात या समस्या प्रकर्षाने निदर्शनास आल्या असून तातडीने उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

**रीस उपकेंद्र‘मृत्यूच्या छायेत’ सेवा सुरू**

रीस उपकेंद्राची अवस्था अत्यंत चिंताजनक बनली आहे. पावसाळ्यात सर्व खोल्यांमध्ये पाणी साचणे,भिंतींमधून गळती होणे, तसेच मागील वर्षी छताचा काही भाग कोसळण्याची घटना ही धोक्याची घंटा ठरली आहे.उपकेंद्राला कंपाउंड व प्रवेशद्वार नसल्यामुळे सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. असमतल परिसर व ड्रेनेज व्यवस्थेचा अभाव यामुळे परिस्थिती अधिक बिकट झाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनी इमारत वापरण्यास अयोग्य असल्याचे स्पष्ट करत संपूर्ण पुनर्बांधणीचा सल्ला दिला आहे.

रिक्त पदे :२ ANM, १ MPW, १ परिचर

मोहपाडा उपकेंद्र* *कोसळत्या इमारतीत आरोग्य सेवा

मोहपाडा उपकेंद्रात दोन खोल्यांचे छत अंशतःकोसळले असून भिंतींना मोठ्या प्रमाणावर तडे गेले आहेत. पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर गळती होत असल्याने रुग्ण व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अर्थिंग व्यवस्था नसणे व सौरऊर्जा प्रणाली बंद पडलेली असणे ही अतिरिक्त धोकादायक बाब आहे.विशेष म्हणजे वासांबे उपकेंद्रही याच ठिकाणी कार्यरत असल्याने येथील ताण अधिक वाढला आहे.

रिक्त पदे :२ ANM, १ CHO, १ MPW पदे रिक्त असल्याचेही यावेळी समजले

तातडीने अभियंता पाहणी करून दुरुस्ती की पुनर्बांधणी याबाबत निर्णय घ्यावा

वासांबे उपकेंद्र: स्वतंत्र जागेअभावी सेवा ठप्प

वासांबे उपकेंद्र सध्या मोहोपाडा येथेच सह-स्थित असल्यामुळे सर्व अडचणींचा थेट परिणाम येथील सेवांवर होत आहे.स्वतंत्र इमारत व जागा नसल्यामुळे आरोग्य सेवा पुरवण्यात अडथळे निर्माण होत असून रुग्णांना योग्य सुविधा मिळत नाहीत.१ ANM,१ CHO अशी रिक्त पदे असून ठोस मागण्या पुढे या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडे पुढील तातडीच्या मागण्या करण्यात आल्या आहेत

रीस उपकेंद्राची तात्काळ पुनर्बांधणी

मोहोपाडा उपकेंद्राची अभियंता पाहणी करून आवश्यकते नुसार दुरुस्ती किंवा पुनर्बांधणी वासांबे उपकेंद्रासाठी स्वतंत्र जागा व नवीन इमारत उभारणी सर्व उपकेंद्रांवरील रिक्त पदे तातडीने भरणे


**आरोग्य व्यवस्था धोक्यात,प्रशासन जागे होणार का?**

आरोग्य सेवेसारख्या अत्यावश्यक क्षेत्रात अशा धोकादायक परिस्थितीत काम सुरू ठेवणे ही गंभीर बाब असून, नागरिकांच्या जीविताशी थेट खेळ सुरू असल्याची भावना व्यक्त होत आहे. संबंधित यंत्रणांनी याकडे तातडीने लक्ष देत ठोस निर्णय घेणे गरजेचे बनले आहे.

# सणसर यात्रेत सिनेअभिनेत्री खुशी शिंदेचा कार्यक्रम ठरला चर्चेचा विषय

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील सणसर येथे बुधवार दि.२२ एप्रिल रोजी झालेल्या हिंदी–मराठी गाण्याच्या कार्यक्रमाने सिनेअभिनेत्री खुशी शिंदे हिने सणसर गावातील युवकांना व महिलावर्गाला अक्षरशः भुरळ घातली.भैरवनाथ यात्रा संपन्न होऊनही आजही गावोगाव,चौकाचौकात तिच्या कार्यक्रमाचीच चर्चा रंगत आहे.



कार्यक्रमाचे नियोजन तिच्या टीमने व सणसर भैरवनाथ यात्रा कमिटीने काटेकोरपणे केले होते.कार्यक्रमाची वेळेत सुरुवात,उत्कृष्ट सादरीकरण आणि प्रेक्षकांना खिळवून ठेवणारी नृत्य–गायनाची जादू यामुळे युवकांनी आणि महिलावर्गाने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.भैरवनाथ यात्रेतील इतर कार्यक्रम संपले तरी खुशी शिंदेच्या केलेल्या कार्यक्रमाच्या सादरीकरणाने निर्माण केलेले वातावरण अजूनही ताजे राहिलेले दिसत आहे.सणसर परिसरात आजही लोकांच्या चर्चेत एकच मुद्दा आहे तो म्हणजे “खुशी शिंदेने भैरवनाथ यात्रेत केले मार्केट जाम!”

# यशवंत साबळे यांची रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या “कार्याध्यक्ष” पदावर निवड

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर :** उद्योजकता आणि समाजकार्यात संतुलित व प्रेरणादायी वाटचाल करणारे आदरणीय श्री. यशवंत लक्ष्मणशेठ साबळे यांची रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या कार्याध्यक्ष पदावर निवड झाली आहे. त्यांच्या नेतृत्वगुणांची, कर्तृत्वाची आणि समाजनिष्ठेची ही निवड गौरवपूर्ण पावती मानली जात आहे.



बांधकाम व कन्स्ट्रक्शन क्षेत्रात ठसा उमटवत त्यांनी उद्योजक म्हणून स्वतःची भक्कम ओळख निर्माण केली आहे. त्याचबरोबर बँकिंग व क्रीडा क्षेत्रात सक्रिय सहभाग नोंदवत विविध घटकांना जोडण्याचे काम त्यांनी सातत्याने केले आहे. विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सेवा कार्य राबवत त्यांनी जनतेचा विश्वास संपादन केला आहे.

भाजप नेते म्हणून जनतेच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेत विकासाभिमुख दृष्टीकोनातून कार्य करणारे यशवंत साबळे हे “नावात यश, कर्मात सेवा” या उक्तीला साजेसे व्यक्तिमत्त्व ठरले आहेत.त्यांच्या निवडीमुळे रायगड जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली क्रिकेट क्षेत्राचा विकास होऊन नवोदित खेळाडूंना अधिक संधी उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या निवडीबद्दल विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# अडोळी ग्रामपंचायतीत राष्ट्रीय पंचायतराज दिन उत्साहात; ‘माझं गांव, आरोग्य संपन्न गाव’ अभियानावर भर

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी :** गावाच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प दृढ करत अडोळी येथील ग्रामपंचायतीत २४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता राष्ट्रीय पंचायतराज दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत प्रशासक सविताताई इढोळे होत्या.

यावेळी प्राथमिक आरोग्य उपकेंद्र अडोळीच्या डॉ. निता मापारी, ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन, समाजसेवक राजकुमार पडघान, आरोग्य सेवक मारोती इंगळे, खंडोबा कन्स्ट्रक्शनचे संचालक परमेश्वर इढोळे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे




अध्यक्ष सतीश इढोळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

यानंतर ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन यांनी ग्रामसभेतील ठराव वाचून दाखवले. उपस्थित ग्रामस्थांच्या सहमतीने गाव विकाससंबंधी महत्त्वाचे ठराव मंजूर करण्यात आले. यामध्ये विशेषतः ‘माझं गांव, आरोग्य संपन्न गाव’ अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर देण्यात आला.

डॉ. निता मापारी यांनी मार्गदर्शन करताना ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य सुधारण्यासाठी आवश्यक उपाययोजना स्पष्ट केल्या. त्यांनी कुष्ठरोग, हिवताप, जलजन्य व संसर्गजन्य आजार, स्त्री-पुरुष समानता, स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन यासारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल माहिती दिली. आरोग्यदायी गाव घडविण्यासाठी जनजागृती व प्रत्यक्ष कृती दोन्ही आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.याचवेळी ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन, समाजसेवक राजकुमार पडघान आणि आरोग्य सेवक मारोती इंगळे यांनीही ‘माझं गांव, आरोग्य संपन्न गाव’ या अभियानाच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकत ग्रामस्थांना सक्रिय सहभागाचे आवाहन केले.कार्यक्रमाला ग्रामपंचायत सदस्य, शिक्षक, आशा वर्कर्स, महिला बचत गटाच्या सदस्य, अंगणवाडी सेविका तसेच गावातील महिला-पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अरविंद पडघन यांनी केले, सूत्रसंचालन राजकुमार पडघान यांनी केले तर आभार प्रदर्शन रोजगार सेवक दौलत पडघान यांनी मानले.यावेळी ग्रामपंचायत कर्मचारी पंढरी इढोळे, रवि इढोळे, सुमेध खंडारे, सागर इढोळे यांचीही उपस्थिती होती.

# नाशिक कलावंत मंच पुरस्कार अभिनेते ज्ञानदेव शिंदे यांना प्रदान



**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर :** संगमनेर तालुक्यातील चणेगाव येथील अभिनेता ज्ञानदेव नरहरी शिंदे यांना नुकताच नाशिक येथे कलावंत विचार मंच कमल फिल्म प्रोडक्शन आणी कमल म्युझिक मराठी यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक येथे कलावंत पुरस्कार अध्यक्ष सुनील मोंढे यांच्या हस्ते समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.या पुरस्कार वितरण सोहळा प्रसंगी जेष्ठ साहित्यिक सुभाष सोनवणे,अभिनेत्री दिपाली कुलकर्णी, प्रा.सोमनाथ मुठाळ, कवीयत्री सुनीता वाळुंज हे उपस्थित होते अभिनेते ज्ञानदेव शिंदे यांनी कलावंत पुरस्कार नाशिक येथे स्वीकारला यावेळी महाराष्ट्राचे अनेक कलावंतांना पुरस्कार देण्यात आले प्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते.

# 135 वर्षांची शिक्षण परंपरा: अक्षीकर पुरस्कारांनी आदर्श शिक्षकांचा सन्मान"

## छबिलदास शाळा, दादर येथे जनरल एज्युकेशन सोसायटीचा १३५ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा!

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी :** जनरल एज्युकेशन सोसायटीच्या १३५ व्या वर्धापन दिनानिमित्त दादर येथील छबिलदास शाळेत 'अक्षीकर पुरस्कार' वितरण सोहळा अत्यंत उत्साहात आणि अभिमानाने पार पडला. संस्थेचे आद्य संस्थापक कै. गोपाळ नारायण अक्षीकर यांनी २४ एप्रिल १८९२ रोजी स्थापन केलेल्या या संस्थेच्या मुंबईमध्ये दादर, कुर्ला, ठाणे, डोंबिवली, कल्याण, भिवंडी, रायगड - उरण येथे मराठी, इंग्रजी माध्यमांसह व सीबीएसई पॅटर्न शाळा - महाविद्यालयांची एकूण संख्या ४९ इतकी असून असुन शिक्षण क्षेत्रातील समृद्ध परंपरेचा लौकिक गौरव विस्तारात आहे. संस्थेची विचारधारा जपणाऱ्या आदर्श शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, निवृत्त कर्मचारी तसेच विशेष गुणवत्ता प्राप्त शिक्षकांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

हा सोहळा छबिलदास मुला-मुलींची शाळा, दादर येथील अक्षीकर-ताम्हाणे सभागृहात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष व माजी विद्यार्थी देवराज लालचंद राका अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी म्हणून मुंबई महानगरपालिकेचे उपमहापौर व माजी विद्यार्थी संजय घाडी, तसेच सनदी लेखापाल व माजी अध्यक्ष (ICAI) मुकुंद चितळे उपस्थित होते. याशिवाय कार्याध्यक्ष शैलेंद्र साळवी, कोषाध्यक्ष रवींद्र ताम्रस, उपकार्याध्यक्ष प्रदीप राका, उपकार्यवाह महेश केळकर आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक दीपप्रज्वलनाने झाली. संस्थापक गोपाळ नारायण अक्षीकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करत वृक्ष व भारतीय संविधानाच्या प्रतीचे पूजन करून एक अभिनव आणि मूल्याधिष्ठित सुरुवात करण्यात आली.




यावेळी बोलताना संस्थेचे कार्याध्यक्ष शैलेंद्र साळवी यांनी आपल्या मनोगतात संस्थेच्या १३५ वर्षांच्या अखंड परंपरेचा उल्लेख करत, बदलत्या काळात शिक्षण संस्थांची भूमिका अधिक मूल्याधिष्ठित करण्याची गरज व्यक्त केली. "गुरु-शिष्य परंपरेतील मूल्यशिक्षणाची पुनर्स्थापना ही काळाची गरज आहे," असे ते म्हणाले.

या सोहळ्याचे प्रमुख अतिथी संजय घाडी यांनी आपल्या शालेय आठवणींना उजाळा देत, "शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये आदरयुक्त प्रेम आणि शिस्त रुजवतात. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी देणारी ही संस्था माझ्यासारख्या अनेकांसाठी प्रेरणास्थान आहे," असे सांगितले.

विशेष अतिथी मुकुंद चितळे यांनी शिक्षकांना सतत विद्यार्थी राहण्याचा संदेश देत सांगितले की, "विद्यार्थ्यांच्या अंतर्गत गुणांना ओळखून त्यांना फुलवण्याची प्रेरणा देणे, हेच खऱ्या शिक्षकाचे कार्य आहे. शिक्षक स्वतः शिकत राहिला, तरच विद्यार्थी प्रगतीचा मार्ग शोधू शकतो," असे प्रतिपादन केले.

यावेळी विविध गटांतील 'अक्षीकर पुरस्कार' विजेत्यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने प्रशिक्षित पदवीधर गट : सौ. रंजना भरत पाटील (कल्याण सुभेदार वाडा हायस्कूल), प्रशिक्षित अ-पदवीधर गट : सौ. कृपा नितीन घाग (मोह विद्यालय, ठाणे), प्राथमिक विभाग : सौ. योगिता विलास कदम (छबिलदास हायस्कूल, दादर), आदर्श शिक्षकेतर पुरस्कार : श्री. प्रदीप काशिनाथ म्हात्रे (नेटिव्ह इन्स्टिट्यूशन, उरण), आदर्श मुख्याध्यापक : श्री. सतीश सोपान घोलप (न्यू हायस्कूल, कल्याण), आदर्श मुख्याध्यापिका : सौ. ज्योती ज्ञानेश्वर पाटील (इंग्लिश मीडियम स्कूल, उरण), आदर्श शिक्षिका पुरस्कार : सौ. सुनीता शैलेंद्र गुप्ता (ब्लॉसम इंटरनॅशनल स्कुल, डोंबिवली), यांचा गुणगौरव रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, मानपत्र देऊन करण्यात आला. पुरस्कार विजेत्यांच्या वतीने सौ. ज्योती पाटील यांनी मनोगत व्यक्त करत संस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील इतरही विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले तसेच संस्थेतील विविध शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेणारा माहितीपट सादर करण्यात आला. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अर्जिता कुलकर्णी, सुनील फर्डे, कल्याणी शितुत आणि सदाशिव कारळे, सई पटवर्धन व राहुल काकडे यांनी खुसखुशीत शैलीत केले. स्वागतगीत श्रीमती सुनेत्रा मिस्त्री यांनी सादर केले.

समारंभात उपस्थित सर्व मान्यवर, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी संस्थेच्या समृद्ध परंपरेचा गौरव करत, शिक्षण क्षेत्रातील योगदानाची नवी दिशा निश्चित केली.

---

## वसंत आला

अता कशाला उगाच चिंता
सरून गेली कठीण वर्षे
जरा कुठे हा वसंत आला
फुलून येऊ सवेच हर्षे

नको अता बंधने ऋतूंची
फुले फुलावी मनाप्रमाणे
हळूच त्यांचे फुलून येणे
निवांत व्हावे प्रकाश गाणे

नभात थोडा प्रकाश आहे
मिळून दोघे फुलास धुंडू
विणा जराशी सवेच छेडू
अजून थोडे सुरात डुंबू

तुला कसे मीं हळूच सांगू
तूझ्या मुळे हा वसंत आला
वठून गेल्या फुलास सुध्दा
तूझ्या दिठीने फुलोर आला

ढळून गेली दुपार आता
मनास थोडा उतार देऊ
विझावयाला उशीर आहे
नभास तोवर वळून पाहू

**श्रीनिवास गडकरी पुणे**

# अनुसूचित जातीचे आरक्षण आणि उपवर्गीकरण

सर्वोच्च न्यायालय यांनी आरक्षण संदर्भात निकाल देतांना म्हटले की,आरक्षण ज्या जातींना मिळाले आहे आणि जे वंचीत आहेत.अशा लोकांना त्याचा सर्वांगीण विकास होण्याच्या हेतूने आरक्षणातून उपवर्गीकरण होण्या संदर्भात सात बेंच असलेल्या न्यायाधीश यांनी एका बाजूला सहा आणि दुसऱ्या बाजूला एक असा निकाल दिला. आणि सर्व राज्यांना तशी शहानिशा करून अंमलबजावणी करण्याचे सांगीतले होते. त्यामुळे काही ठिकाणी अंमल बजावणी करण्यासाठी प्रक्रिया चालू केलेली आहे. आपण जर आरक्षण संदर्भात विचार केला तर लक्षात येईल की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रवर्ग तयार केले आहे. म्हणजे ओबीसी चा प्रवर्ग,एस सी चा प्रवर्ग आणि एस टी चा प्रवर्ग असा प्रवर्ग तयार केलेला आहे. या प्रवर्गा मुळे सर्वांना सारखे आरक्षण दिलेले आहे. समजा एस सी प्रवर्गात दहा जागा निघाल्या असतील तर त्यामध्ये एकोणसाठ जाती असल्यामुळे त्या निघालेल्या जागा सर्वांसाठी आहेत. म्हणजे अनुसूचित जाती मधील सर्व जातीसाठी आहे. आणि त्या समान पातळीवर आहे. याचा अर्थ एकोणसाठ जाती साठी आहे.जी उमेदवार ही सर्वात परीक्षेत मार्क जास्त घेतील मग तो एकोणसाठ मधील कोणत्याही जातीचा असो त्याला सिलेक्शन करण्यात येते. महार जात ही 37 क्रमांक वर येते तीही जातीची मुले या परीक्षेत बसतात,अंत्यन्त परिश्रम घेऊन मेरिट येतात आणि परिश्रमाणे नोकरी मिळवितात. खरं तर मग या महार समाजाने मांग,मादगी यांचे आरक्षण किंवा जागा घेतल्या कशा,जागा तर या एस सी प्रवर्गा साठी होत्या.ही बाब मांग,मादगी आणि इतर समाजाने समजून घेण्याची गरज आहे.

खरं तर अनुसूचित जातीमधील अनेक जागा अनेक कार्यालयात रिक्त आहेत.त्याचा अनुशेष अजूनही भरला गेला नाही.कंत्राटी पद्धतीने अनेक ठिकाणी काम सुरु आहे. पंचायत समिती मध्ये असेल, जिल्हा परिषद मध्ये असतील, किंवा तहसील कार्यालयात असतील, किंवा वीज निर्मिती मध्ये असतील,या ठिकाणी असलेल्या जागा म्हणजे कंत्राटी पद्धतीने होत असलेले काम थांबवून नियमित अनुसूचित जातीतील बेरोजगार यांना भरती करून भरण्यात याव्यात अशी मागणी न करता,मांग,मादगी मधील काही जर महार समाजातील लोकांनी आमच्या जागा बळकावल्या असा आरोप करीत असतील तर ते चुकीचे आहे.अज्ञान आहे. म्हणजे जागा या एस सी प्रवर्गातील निघत असल्यामुळे आणि त्यात सर्व जातीतील लोकांना फार्म भरण्याची मुभा असल्याने महार समाजांनी आमच्या जागा घेतल्या असा आरोप करणे आणि इतरही लोकांच्या मनात या महार समाजबद्दल द्वेष निर्माण करणे,पसरविणे योग्य नाही. एस सी प्रवर्गातील जाती, जातीत भांडणे लावण्याचा तो प्रकार आहे.एक संघ असलेल्या प्रवर्गातील लोकांमध्ये फूट निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ओबीसी प्रवर्गातील असो या एस सी प्रवर्गातील असो या एस टी प्रवर्गातील असो यांना समान अधिकार दिले आहे.त्यामुळे कोणाची प्रगती झाली, कोणाची झाली नाही याला कोणतीही जात दोषी नाही तर ते आपले अज्ञान कारणीभूत आहे.हे समजून घेण्याची गरज आहे.प्रगती पासून कोणीही वंचीत असता कामा नये यासाठी च संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रवर्ग तयार केला आहे आणि सर्वांना समान संधी उपलब्ध करून दिली आहे.श्रीमंत आणि उच्च वर्णीय तुमच्या मधील विभागणी मुळे अन्याय करतील ही जाणीव संविधान निर्माते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना होती. संविधान अंमल बजावणीच्या 75 वर्षात देखील संविधान मध्ये आरक्षणाची तरतूद असतांना देखील शासनात असणाऱ्यांनी आरक्षण पूर्ण भरून काढले नाही आणि ओबीसी,एस सी,एस टी,प्रवर्गातील लोकांना पाहिजे त्या प्रमाणात आपला मूलभूत अधिकार आणि मूलभूत कर्तव्य पाहिजे त्या प्रमाणात न समजल्या मुळे आता पर्यंत अनुशेष भरला गेला नाही आणि कंत्राटी पद्धत जोर धरू लागली आहे.ही बाब जेवढ्या लवकर हा मागासवर्गीय समाज आणि इतर मागासवर्गीय समाज समजेल आणि योग्य दिशेने वाटचाल करून आपला हक्क आणि अधिकार मिळवून घेण्यास सज्ज होईल तेव्हा प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही. हे समजणे काळाची गरज आहे.

बदर समितीने काय अहवाल शासनाकडे सादर केला तो जाहीर न झाल्यामुळे पाहिजे त्या प्रमाणात आप,आपले मत मांडणे कठीण आहे. पण एक मात्र निश्चित म्हणता येईल कोणीही कोणाच्या जागा बळकावल्या नाही. कारण ओबीसी, एस सी, आणि एस टी, एन टी, या प्रवर्गाच्या जागा निघतात, जातीच्या नाही, जसे मादगी, मांग, चांभार, भंगी, महार अशा जातीच्या जागा आज पर्यंत कधीही निघालेल्या नाही.त्यामुळे या जातीने आमच्या जागा घेतल्या हे म्हणणे म्हणजे जाणूनबुजून त्या जातीला टार्गेट करून इतर जातीच्या मनात द्वेष पसरविण्याचा प्रयत्न आहे. एक संघ असणाऱ्या प्रवर्गाला तोडण्याचा प्रयत्न आहे. जर एस सी प्रवर्गातील तीस जातीच्या लोकांनी उपवर्गीकरन व्हावे अशी मागणी असती तर ठीक आहे. केवळ एक, दोन जाती म्हणत असतील आणि त्याच्या म्हणण्या नुसार उपवर्गीकरन होत असेल तर ते योग्य नाही. सर्वोच न्यायालयाने जो निर्णय दिला आहे. त्यात सरकारने योग्य त्या संदर्भात ज्यांचा विकास झाला नाही त्या बाबतीत पावले उचलावी असे सांगितले आहे. त्या दृष्टीने सरकारने योग्य ती पावले उचलावी आणि सर्व बाबतीत आरक्षण दिले गेले आहे अशा सर्वांना समान मिळायला हवे असे प्रयत्न करायला हवेत. तर योग्य न्याय मिळेल. खरं तर समान न्याय मिळावे यासाठी संविधान शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रवर्ग तयार केला आहे. मग तो ओबीसी चा असेल या एस,सी चा असेल या एस, टी चा असेल या एन, टी चा असेल हे समजून घेण्याची गरज आहे. आणि जे अभ्यासू आहेत त्यानी वास्तव समजून सांगण्याची गरज आहे. तरच भारतीय समाज एकसंघ राहू शकेल आणि सर्वांना समान न्याय मिळेल.तेव्हा खऱ्या अर्थाने *"अनुसूचित जातीचे आरक्षण आणि उपवर्गीकरन"* संदर्भात आम्हाला समजले असे होईल. आपण कशाप्रकारे समजून घेतो त्यावर सारे अवलंबून आहे. त्यातच सर्वांचे हित आहे.

**अविनाश टिपले**
**9970917389,चंद्रपूर.**



---

# जातीवाचक शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी

## ग्रामपंचायत अधिकाऱ्याविरुद्ध गंभीर गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहुर गड प्रतिनिधी/ सय्यद ईसा :** ग्रामपंचायत कार्यालयात कामासाठी गेलेल्या एका व्यक्तीला जातीवाचक हीन वागणूक देऊन, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी माहूर पोलीस ठाण्यात एका ग्रामपंचायत अधिकाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी माहूर तालुक्यातील शेकापूर येथे घडली.




मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी समाधान अशोकराव कांबळे (वय ३७, रा. शेकापूर) हे २२ एप्रिल रोजी सकाळी १०:३० च्या सुमारास शेकापूर ग्रामपंचायत कार्यालयात विवाह नोंदणी प्रमाणपत्र मिळवण्यासाठी गेले होते. यावेळी तेथे कार्यरत असलेले ग्रामपंचायत अधिकारी नामदेव सुभाष देवकते यांनी जयंती तक्रार प्रकरणी फिर्यादीशी उद्धटपणे बोलण्यास सुरुवात केली.

फिर्यादीने जेव्हा ग्रामपंचायत कार्यालयात मागील दोन वर्षांपासून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी का केली नाही, असा प्रश्न विचारला, तेव्हा आरोपीने संतापून फिर्यादीच्या जातीचा उल्लेख करून सार्वजनिक ठिकाणी अपमानित केले. तसेच, "तू मला विचारणारा कोण?" असे म्हणून अंगावर धावून जात जीवे मारण्याची धमकी दिली आणि खोट्या केसमध्ये अडकवण्याची भीती घातल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या घटनेनंतर समाधान कांबळे यांनी माहूर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. त्यांच्या जवाबावरून पोलिसांनी आरोपी नामदेव सुभाष देवकते याच्याविरुद्ध विविध कलमान्वये (गुरन 74/2026,दिनांक. 23.04.26) गुन्हा नोंदवला आहे.

भारतीय न्याय संहिता (BNS), २०२३, चे कलम ३५२ (शांतता भंग करण्याच्या उद्देशाने अपमान), ३५१ (१), ३५१ (२) (गुन्हेगारी थमकी).

तसेच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ (Atrocities Act) चे कलम ३ (१) (r), ३(१) (5) आणि ३(२) (va) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरण अधिक तपास कामी उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे यांच्या कडे सोपवण्यात आले आहे. काल तातडीने त्यांनी घटनास्थळावर जाऊन पंचनामा केल्याचे ही वृत्त आहे. सार्वजनिक ठिकाणी घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात चर्चेला उधाण आले असून, आरोपीने खोटे गुन्हे दाखल करण्याच्या दिलेल्या धमकी प्रमाणे पोलिसात समाधान कांबळे विरुद्ध सरकारी कामात अडथळा केल्याची तक्रार दिनांक 22 रोजीच दाखल केली होती. सामाजिक कार्यकर्त्यांनी सबुरी ठेवण्याचा सल्ला दिल्यामुळे, तक्रार लिहून असतांनाही समाधान ने दिली नव्हती. पण ग्रामसेवकाने सायंकाळी तक्रार दिल्यानंतर रात्री समाधान कांबळे यांनी तक्रार दिली. ती दुसऱ्या दिवशी 23 रोजी उशिरा दाखल करण्यात आली. कार्यकर्त्यांनी प्रश्न विचारला तर शासकीय कामात अडथळा करीत आहात, असा धमकीवजा इशारा अनेक कामचोर, मुजोर अधिकारी कर्मचाऱ्यांकडून दिला जातो. या आधी गुन्हे पण दाखल करण्यात आले आहेत. प्रामाणिक अधिकारीकर्मचारी केवळ आपल्या कामात व्यस्त असतात.

विचारलेली माहिती देतात, सर्व सामन्यांच्या अडीअडचणी जलद गतीने मार्गीही लावतात हा अनुभव आहे.

एका प्रशासकीय कर्मचाऱ्यांकडून झालेल्या अशा वर्तणुकीबद्दल संताप व्यक्त केला जात आहे.

---

# मावनता हाच खरा धर्म : महेंद्रशेठ घरत

**महेंद्रशेठ घरत यांची दिनदुबळ्यांना मदत करण्याची भूमिका लाजवाब : भावना घाणेकर**



**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** "जगाच्या कानाकोपऱ्यात मी कामगार नेता म्हणून जात असतो. जागतिक पातळीवर कामगारांचे कायदे बनवले जातात, अशा व्यासपीठावर माझी ऊठबस असते. त्यामुळे परदेशात जाणे-येणे सर्रास झाले आहे. अशावेळी मी प्रवासात आवर्जून त्या त्या देशांतील चर्चमध्ये जातो. चर्चची भव्यता, शांतता, येशूला बघूला मनाला शांती लाभते. विशेष म्हणजे बहुतांश चर्च किमान ५०० वर्षांपूर्वीच्या आहेत. तिथे गेल्यावर वेगळीच प्रसन्नता मनाला लाभते. विरोध आमच्या संतांनाही त्या त्या काळी पत्करावा लागला आहे. विरोध नवीन नाही, पण आपण लढले पाहिजे, चालत राहिले पाहिजे, हीच माझी भूमिका आहे. भारत हा बहुभाषिक आणि सर्व धर्मांना सामावून घेणारा देश आहे. सर्व धर्म ग्रंथांत मानवतेचाच संदेश आहे. ज्ञानेश्वर महाराज यांनीही ज्ञानेश्वरीत 'पसायदाना'द्वारे जगाच्या कल्याणाचा विचार केला आहे. साने गुरुजींनी सांगितले आहे, 'जगाला प्रेम अर्पावे'. त्यामुळे त्याच वाटेवर मी चालत आहे. ख्रिस्ती समाजाने आपल्या हक्काचे ठिकाण म्हणून उलवा नोडमध्ये चर्च निर्माण करावे, मी खंबीरपणे उभा आहेच," असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत ख्रिस्ती समाजाला संबोधन करताना म्हणाले. उलवे नोडमधील भूमिपुत्र भवन येथे ख्रिस्ती समाजाचा दोन दिवसीय शांती मेळावा पार पडला. शुक्रवारी (ता. २४) अखेरच्या सत्रात महेंद्रशेठ घरत यांनी ख्रिस्ती समाजाला आश्वासित केले. ते पुढे म्हणाले, "काँग्रेस हा सर्वधर्म समभाव मानणारा पक्ष आहे आणि त्या पक्षाचा मी रायगड जिल्हाध्यक्ष म्हणून काम करतोय. मी कुठेही गेलो तरी माणसातच देव पाहतो. म्हणूनच 'सुखकर्ता' बंगल्यावरून कुणीही रिकाम्या हाताने परत जाणार नाही, याची काळजी घेतो."

"महेंद्रशेठ घरत यांच्याविषयी मी ऐकून होते. मला फार काही त्यांच्याविषयी माहिती नव्हते; परंतु उरणमध्ये मी नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवावी, म्हणून ते नुसते बोलले नाहीत, तर खंबीरपणे मागे उभे राहिले. एक लिडर कसा असावा, याचे उदाहरण म्हणजेच महेंद्रशेठ घरत होय, असे मी अभिमानाने सांगेन. आजघडीला देशात प्रत्येकाच्या मनात अस्वस्थता आहे. सध्या जे टोकाचे राजकारण सुरू आहे. ते निंदनीय आहे. आई-वडिलांच्या सेवेत मुले कमी पडत आहेत; परंतु दिनदुबळ्यांची, पीडितांची सेवा ख्रिस्ती समाज करतोय, हे निश्चितच कौतुकास्पद आहे. त्यामुळे ख्रिस्ती समाजाच्या माणुसकीच्या लढ्यात मी खंबीरपणे साथ देण्यास तयार आहे. महेंद्रशेठ घरत यांची दिनदुबळ्यांना मदत करण्याची भूमिका लाजवाब आहे. असा नेता आपल्याला लाभणे, हे सुद्धा भाग्यच आहे. त्यांच्याविषयी माझ्या मनात नितांत आदर कायम राहील," असे उरणच्या नगराध्यक्षा भावनाताई घाणेकर ख्रिस्ती समाजाला संबोधित करताना उलवे नोड येथील 'भूमिपुत्र भवन' येथे म्हणाल्या.

यावेळी प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनीष पाटील, माजी नगरसेविका अफशा मुकरी आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. ख्रिस्ती समाजाच्या शांती मेळाव्यासाठी महेंद्रशेठ घरत यांनी दोन दिवसांसाठी 'भूमिपुत्र भवन' प्रायोजित केल्याबद्दल ख्रिस्ती समाजाच्या वतीने त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रार्थना करण्यात आली.२३ आणि २४ एप्रिल रोजी समस्त उलवे ख्रिस्ती समाजाच्या वतीने एकता सभा झाली. यावेळी प्रेरित राम बाबू यांनी मार्गदर्शन केले. आयोजक बबन कांबळे, धनंजय नाईक, विकी कुलकर्णी, आनंद मतमारी, प्रल्हाद लकडा आणि त्यांची टीम, तसेच समस्त उलवे ख्रिस्ती समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# घरातील किरकोळ अपघाताने पार्कीन्सनग्रस्त महिलेच्या पाठीचा कणा झाल फ्रॅक्चर; वेळीच उपचारांमुळे ती पुन्हा चालु लागली

## मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये प्रगत काइफोप्लास्टीमुळे ६८ वर्षीय रुग्णाला मिळाले नवे आयुष्य

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले** /नवी मुंबई : घरात पडल्यामुळे पाठीच्या कण्याला गंभीर दुखापत झालेल्या ६८ वर्षीय महिलेला अत्याधुनिक आणि मिनिमली इन्व्हेसिव्ह ‘काइफोप्लास्टी’ उपचारामुळे केवळ काही दिवसांत पुर्ववत चालता येऊ लागले असून रुग्णाचा आत्मविश्वासही वाढला आहे. खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलचे न्यूरोसर्जन डॉ. हरीश नाईक यांच्या नेतृत्वाखाली टीमने या रुग्णावर यशस्वी उपचार केले. रुग्णाला पूर्वीपासूनच उच्च रक्तदाब, इस्केमिक हार्ट डिसीज (पूर्वी स्टेंट बसविला होता), पार्किन्सन आजार आणि हायपोथायरॉईडीझम अशा अनेक आरोग्य समस्या होत्या. त्यामुळे हे प्रकरण अधिक गुंतागुंतीचे आणि आव्हानात्मत होते. मात्र वेळीच निदान आणि प्रगत उपचारांमुळे रुग्ण लवकर बरी झाली आणि पुन्हा हालचाल करू लागली.

खारघर येथे राहणाऱ्या श्रीमती मीना पवार (नाव बदलले आहे) या पार्किन्सन आणि हायपोथायरॉईडीझमसारख्या दीर्घकालीन आजारांशी झुंज देत होत्या. या आजारांमुळे त्यांच्या शारीरीक ऊर्जेवर , संतुलनावर आणि दैनंदिन हालचालींवर परिणाम झाला होता. मात्र २३ फेब्रुवारी २०२६ रोजी घरातील किरकोळ अपघाताने त्यांच्या आयुष्यात मोठा बदल झाला. त्यांना कंबरेखालील भागात तीव्र वेदना सुरू झाल्या आणि दैनंदिन हालचाली करणेही कठीण झाले. त्यानंतर त्यांनी तातडीने मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये पुढील उपचारांसाठी धाव घेतली.

खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलचे न्यूरोसर्जन डॉ. हरीश नाईक यांनी सांगितले,* प्राथमिक तपासणीत मणक्याजवळ वेदना आणि पाठीच्या कण्याच्या हालचालींवर मर्यादा आली, मात्र न्यूरोलॉजिकल कार्य सामान्य होते. पुढील तपासणीत मणक्याचे ‘ऑस्टिओपोरोसिसमुळे झालेले कॉम्प्रेशन फ्रॅक्चर’ याचे निदान झाले. वृद्धांमध्ये हाडे ठिसूळ झाल्यामुळे अशा प्रकारचे फ्रॅक्चर सामान्यपणे आढळून येते. मात्र योग्य वेळी उपचार न झाल्यास हालचालींवर आणि जीवनमानावर गंभीर परिणाम होऊ शकतो. सुरुवातीच्या उपचारांना अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने आम्ही ‘ बलून व्हर्टिब्रोप्लास्टी




(काइफोप्लास्टी)’ करण्याचा निर्णय घेतला.

ते पुढे सांगतात की, या प्रक्रियेत फ्रॅक्चर झालेल्या मणक्यात एक छोटा बलून घालून त्याची उंची पुन्हा मिळवण्याचा प्रयत्न केला जातो आणि त्यानंतर त्या जागेत ‘बोन सिमेंट’ भरून मणका स्थिर केला जातो. यामुळे वेदना त्वरीत कमी होतात आणि रुग्णाला लवकर चालता येते. ही प्रक्रिया मिनिमली इन्व्हेसिव्ह प्रक्रिया असल्यामुळे वयोवृद्ध रुग्णांसाठी सुरक्षित ठरते. बहुतांश रुग्णांना २४ ते ४८ तासांत वेदनांपासून आराम मिळतो. तसेच दीर्घकाळ वेदनाशामक औषधांवरील अवलंबित्व कमी होते.

ही प्रक्रिया इमेजिंग मार्गदर्शनाखाली ‘ट्रान्सपेडिक्युलर’ पद्धतीने करण्यात आली. डी १२ मणक्यात काळजीपूर्वक बलून घालून जागा तयार करण्यात आली आणि मणक्याची उंची अंशतः पुनर्स्थापित करण्यात आली. त्यानंतर त्या जागेत बोन सिमेंट भरून फ्रॅक्चर झालेले हाड स्थिर करण्यात आले. ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत अचूकपणे पार पडली.

वृद्ध रुग्णांसाठी अशा प्रक्रियेनंतर शक्य तितक्या लवकर हालचाल सुरू करणे महत्त्वाचे असते, कारण दीर्घकाळ बेडरेस्टमुळे स्नायूंना कमकुवतपणा येतो, संसर्ग किंवा रक्ताच्या गाठी तयार होणे अशा गुंतागुंती निर्माण होऊ शकतात. या रुग्णाने उपचारांना चांगला प्रतिसाद दिला. इतरांच्या मदतीने चालणे सुरू केले आणि अल्पावधीतच प्रकृतीत लक्षणीय सुधारणा दिसून आली. योग्य काळजी घेतल्यास अशाप्रकारचे रुग्ण पुन्हा नियमित जीवन जगू शकतात, *असेही डॉ. नाईक यांनी सांगितले.

उपचारानंतर रुग्णाला वॉर्डमध्ये हलवून आयव्ही औषधे, द्रवपदार्थ आणि हळूहळू हलका आहार सुरू करण्यात आला. ‘टेलर ब्रेस’च्या सहाय्याने रुग्णाने चालण्यास सुरुवात केली. प्रकृती स्थिरावल्याने आणि उपचारांना चांगला प्रतिसाद मिळाल्याने त्यांना २७ फेब्रुवारी २०२६ रोजी घरी सोडण्यात आले. त्यानंतर तज्ज्ञांनी दिलेली औषधं न वगळता नियमित औषधांचे सेवन करणे, डॉक्टरांचा सल्ल्याशिवाय औषधांचे सेवन बंद न करणे, नियमित फॉलो-अप करणे आणि तेलकट व चरबीयुक्त अन्न पदार्थ टाळण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

पार्किन्सनमुळे आधीच आयुष्य कठीण झाले होते, त्यात पडल्यामुळे परिस्थिती आणखी बिघडली. वेदनांशिवाय चालता येईल अशी आशाच उरली नव्हती. पण याठिकाणी मिळालेल्या अचूक उपचारांमुळे आणि डॉक्टरांच्या पण प्रयत्नांनी मला पुन्हा चालण्यासाठी आत्मविश्वास मिळाला. मी डॉ. नाईक आणि त्यांच्या टीमची आभारी आहे, *असे रुग्ण श्रीमती मीना पवार यांनी व्यक्त केली.

या प्रकरणातून वृद्धांमध्ये पाठीच्या कण्याच्या फ्रॅक्चरच्या उपचारासाठी वेळीच उपचार आणि प्रगत मिनिमली इन्व्हेसिव्ह तंत्रज्ञान किती महत्त्वाचे आहे, हे अधोरेखित होते.

योग्यवेळी आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली उपचार मिळाल्यास गंभीर गुंतागुंत असलेल्या रुग्णांनाही चांगले परिणाम मिळू शकतात आणि त्यांचे स्वावलंबन पुन्हा प्राप्त होऊ शकते, *असे मेडिकव्हर हॉस्पिटल, नवी मुंबईचे केंद्र प्रमुख संदीप जोशी यांनी स्पष्ट केले.

# शुद्ध पाण्याची 'सडलेली' गोष्ट !

## पवारवाडीकरांच्या नशिबात सरडा सडलेले पाणी

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील पवारवाडी ग्रामपंचायतीचा संतापजनक कारभार उघडकीस आला आहे. गावातील पिण्याच्या पाण्याच्या मुख्य पाईपलाईनमध्ये चक्क सडलेला सरडा आढळल्याने संपूर्ण गावात खळबळ उडाली आहे.नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.गेल्या काही दिवसांपासून गावातील पाणीपुरवठ्याला दुर्गंधी येत असल्याचे नागरिकांनी निदर्शनास आणले होते. तपासणीदरम्यान पाईपलाईनमध्ये मेलेला आणि पूर्णपणे सडलेल्या अवस्थेतील सरडा सापडला. हेच दूषित पाणी गावकरी गेल्या काही दिवसांपासून पीत होते.यामुळे कॉलरा, गॅस्ट्रो किंवा इतर जलजन्य आजारांची भीती निर्माण झाली आहे.लाखो रुपये खर्च करून राबवल्या जाणाऱ्या पाणीपुरवठा योजनांची हीच का निगा?असा तिखट सवाल ग्रामस्थ विचारत आहेत. टाकीची स्वच्छता आणि पाईपलाईनची देखभाल करण्याकडे ग्रामपंचायतीने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.सरडा सडला तरी प्रशासनाला वास कसा आला नाही? टाकीच्या स्वच्छतेचे रजिस्टर फक्त कागदावरच रंगवले जाते का?जीवितहानी झाल्यास प्रशासक आणि ग्रामसेवक जबाबदारी घेतील का? पाणीपट्टी वसूल करताना तत्परता दाखवणारे



प्रशासन स्वच्छतेत कुचराई का करते? लोकांच्या घामाचा पैसा पाणीपट्टीच्या रूपाने वसूल केला जातो,मग त्यांना विषारी पाणी का पाजले जात आहे? या गंभीर निष्काळजीपणाबद्दल संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी ,अशी मागणी नागरिकांनी केली आहे.वरिष्ठ प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी,अन्यथा गावकरी तीव्र आंदोलन छेडण्याच्या तयारीत आहेत.पवारवाडीच्या या घटनेने संपूर्ण इंदापूर तालुक्यात संताप व्यक्त होत असून या'सडलेल्या' कारभाराचे शुद्धीकरण कधी होणार,याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**यात्रा तोंडावर असताना अशा प्रकारच्या घटना ही अतिशय धक्कादायक आहे प्रशासनाने यातून व्यवस्थित मार्ग काढावा त्याच बरोबर मागील एक वर्षापूर्वी याच ठिकाणी मृत खारताई वाहत आली होती पवारवाडी ग्रामपंचायत येथे वारंवार तोंडी तक्रारी केली असून सुद्धा त्यात काहीच फरक पडत नसल्याच्या नागरिकांचे मत आहे.**

**मा.सुभाष इंगोले**
**उपाध्यक्ष,प्रहार दिव्यांग संघटना पुणे जिल्हा.**

**पवारवाडी ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवक आटोळे मॅडम यांच्यासोबत फोनवर चर्चा करताना सांगितले की आमच्या ग्रामपंचायतच्या टाकीतून सरडा येऊ शकत नसून ग्रामपंचायतच्या टाक्या झाकल्या असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची टाकी झाकली नसल्यामुळे तिथून सरडा येऊ शकतो. टाक्या धुतल्यानंतर खराब पाणी जाण्यासाठी टाकलेली दुसऱ्या पाईपलाईन मधून हा सरडा धनाजी घोलप यांच्या येथील पाईपमध्ये आलेला आहे.**

**मा.आटोळे मॅडम**
**ग्रामसेवक पवारवाडी**

# मुरुडमध्ये 108 रुग्णवाहिका रस्त्यातच ठप्प; गंभीर रुग्णाचा अर्धा तास जीवनाशी संघर्ष

**विजेचा धक्का लागलेल्या शेतकऱ्याला लातूरला नेताना प्रकार; खाजगी रुग्णवाहिकेतून अखेर हलवले, संतापाची लाट**

**दैनिक युवक आधार**

**लातूर ग्रामीण मोहम्मद पिंजारी** : मुरुड येथे महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा (108) रुग्णवाहिकेतील गंभीर निष्काळजीपणाचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विजेचा धक्का लागून गंभीर भाजलेल्या तरुण शेतकऱ्याला उपचारासाठी लातूरला नेत असताना भर रस्त्यातच रुग्णवाहिकेचा खालचा रॉड तुटून गाडी बंद पडली. परिणामी, अत्यवस्थ रुग्णाला तब्बल अर्धा तास 38 अंश तापमानाच्या कडक उन्हात वेदनांनी तळमळत पडून राहावे लागले.



ही घटना शनिवारी (दि. 25 एप्रिल) दुपारी सुमारे 2 वाजता मुरुड बस स्थानकाजवळ घडली. वाठवडा (ता. कळंब) येथील बालाजी कोकाटे हे शेतात काम करत असताना अचानक विजेचा धक्का बसला. या अपघातात त्यांचे दोन्ही हात, छाती, पोट व पायाजवळील भाग गंभीररीत्या भाजला. त्यांना तातडीने मुरुड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

प्राथमिक उपचारानंतर डॉक्टरांनी त्यांना पुढील उपचारासाठी लातूर येथे हलवण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार दुपारी 2 वाजण्याच्या सुमारास 108 रुग्णवाहिकेतून त्यांना रवाना करण्यात आले. मात्र रुग्णालयापासून अवघ्या 200 मीटर अंतरावर असलेल्या बस स्थानकाजवळ अचानक रुग्णवाहिकेचा खालचा भाग तुटून रस्त्यावर पडला आणि गाडी ठप्प झाली.

प्रखर उन्हात रुग्णाची अवस्था अधिकच गंभीर होत होती. चालक व सोबत असलेले डॉक्टर पाटील यांनी नातेवाईकांच्या मदतीने रुग्णवाहिका रस्त्याच्या बाजूला घेतली. मात्र दुसरी रुग्णवाहिका येण्यात विलंब होत असल्याने परिस्थिती अधिकच चिंताजनक बनली.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच युवक काँग्रेसचे बाबा सवासे, सूरज कांबळे, समाधान गायकवाड व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तात्काळ 108 च्या वरिष्ठांशी संपर्क साधून पर्यायी रुग्णवाहिकेची मागणी केली. प्रतिसाद उशिरा मिळत असल्याचे लक्षात येताच त्यांनी तत्परता दाखवत खाजगी रुग्णवाहिका बोलावली आणि गंभीर रुग्णाला तातडीने लातूर येथे हलवले.

या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून, “ही केवळ निष्काळजीपणा नाही, तर रुग्णांच्या जीवाशी खेळ आहे,” अशी प्रतिक्रिया नागरिकांकडून उमटत आहे. संबंधित यंत्रणेवर तात्काळ व कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

# शहीद कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित ‘शिवाजी कोण होता?’ पुस्तक प्रकरणी आ . संजय गायकवाड यांच्या प्रतिमेला ‘जोडे मारो’ आंदोलन

**बागेश्वरधामचे धीरेंद्र शास्त्री यांच्या वक्तव्याचाही निषेध - डॉ.गणेश ढवळे**




**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)**:- शहीद कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या संदर्भात आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप तसेच पुस्तक वितरक प्रशांत आंबी यांना शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या निषेधार्थ लिंबागणेश येथे ‘जोडे मारो’ आंदोलन करण्यात आले. याच वेळी बागेश्वरधामचे धीरेंद्र शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि रामदास स्वामी यांच्या संदर्भात केलेल्या कथित तथ्यहीन वक्तव्याचाही तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. हे आंदोलन सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. गोविंद पानसरे लिखित “शिवाजी कोण होता?” या पुस्तकाच्या शीर्षकावरून पुस्तक न वाचताच आक्षेपार्ह उद्गार काढल्याचा आरोप बुलढाणा येथील आमदार संजय गायकवाड यांच्या वर करण्यात आला आहे. तसेच कोल्हापूर येथील पुस्तक वितरक प्रशांत आंबी यांना व त्यांच्या कुटुंबीयांना शिवीगाळ करून घरात घुसून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप ही आंदोलनकर्त्यांनी केला. या प्रकरणी आमदार संजय गायकवाड यांची सखोल चौकशी करून त्यांच्या वर फौजदारी गुन्हा दाखल करावा व अटक करावी, अशी मागणी करण्यात आली. दरम्यान, धीरेंद्र शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराज लढून थकले होते व त्यांनी राज्यकारभार रामदास स्वामी कडे सोपविला, असे कथित वक्तव्य केल्यामुळे शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या असल्याचे आंदोलनकर्त्यांनी नमूद केले. या वक्तव्याचाही तीव्र निषेध करण्यात आला. शनिवार (दि.२५ एप्रिल) रोजी सकाळी लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आंदोलनकर्त्यांनी आ.संजय गायकवाड यांच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध व्यक्त केला.

यावेळी जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक, बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन पाठविण्यात आले. या आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, विक्रांत वाणी, बाळकृष्ण थोरात, श्रीहरी निर्मळ, भगवान मोरे, रामचंद्र मुळे, सुरेश निर्मळ, सुरज कदम, संतोष भोसले, दादा गायकवाड, दिपक थोरात, गुलाब कांबळे, पप्पू निर्मळ, रावसाहेब निर्मळ, भालचंद्र कुदळे सह आदी शिवप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# जनगणना २०२७ : पनवेल महानगरपालिकेकडून पर्यवेक्षक व प्रगणक प्रशिक्षण यशस्वीरीत्या संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : भारताच्या महत्त्वपूर्ण राष्ट्रीय उपक्रम असलेल्या जनगणना २०२७ अंतर्गत पहिल्या टप्प्यातील तयारीचा एक भाग म्हणून पर्यवेक्षक व प्रगणकांसाठी पनवेल महानगरपालिकेकडून तीन दिवसीय सविस्तर प्रशिक्षण कार्यक्रम दि. २३ ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आले. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली व्हि.के. हायस्कूल (इंदुबाई वाजेकर इंग्लिश माध्यम) येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमात आगामी जनगणनेच्या दृष्टीने सर्व तांत्रिक माहिती, क्षेत्रिय कामकाज, प्रत्यक्ष सराव अशा विविध बाबींवर सविस्तर माहिती देण्यात आली.या प्रशिक्षण कार्यक्रमाचा मुख्य उद्देश जनगणना प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या कर्मचारी वर्गाला अद्ययावत डिजिटल प्रणाली, तांत्रिक कौशल्ये आणि प्रत्यक्ष क्षेत्रीय कामासाठी आवश्यक असलेल्या प्रक्रियांची सखोल माहिती देणे हा होता. केंद्र सरकारच्या निर्देशानुसार यंदाच्या जनगणनेत डिजिटल माध्यमांचा व्यापक वापर करण्यात येणार असून त्यानुसार मोबाईल ॲप आधारित डेटा संकलन पद्धतीवर विशेष भर देण्यात आला. प्रशिक्षणादरम्यान हाऊस लिस्टींग ॲंड हाउसिंग सेन्सस या टप्प्याचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. घरांची



नोंद, कुटुंबीयांची प्राथमिक माहिती, निवास स्थिती, उपलब्ध सुविधा इत्यादी घटकांची अचूक नोंदणी कशी करावी याचे प्रात्यक्षिकांसह स्पष्टीकरण देण्यात आले. तसेच मोबाईल ॲपच्या माध्यमातून डेटा एंट्री, व्हॅलिडेशन, त्रुटी दुरुस्ती , रिअल-टाईम डेटा सबमिशन आणि डेटा सुरक्षा याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.प्रशिक्षण अधिक प्रभावी आणि परिणामकारक होण्यासाठी प्रत्यक्ष सराव, गटचर्चाआणि प्रात्यक्षिक सत्रे आयोजित करण्यात आली. प्रशिक्षणार्थ्यांच्या ज्ञानाचे मूल्यांकन करण्यासाठी ऑनलाइन चाचणी घेण्यात आली. यामुळे सहभागी कर्मचाऱ्यांची तयारी तपासून त्यांना आवश्यक त्या सुधारणा सुचविण्यात आल्या. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, या पूर्वी प्रशिक्षित करण्यात आलेल्या ४५ फील्ड ट्रेनर्स यांनी अत्यंत प्रभावीपणे प्रशिक्षणाची जबाबदारी पार पाडत संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यात मोलाची भूमिका बजावली.

# लाखांदूर पंचायत समिती अंतर्गत पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय अधिकारी यांनी केला करोडोचा गैरव्यवहार

## माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्णे यांची चौकशीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे** : भंडारा-जिल्ह्यातील लाखांदूर पंचायत समिती अंतर्गत पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय अधिकारी यांनी सन 2018- 19 ते 2025- 26 या कालावधीत 81 लाभार्थ्यांना केवळ कागदोपत्री लाभ देऊन अकरा कोटी ,तीन लाख, 40 हजार रुपयाच्या गैरव्यवहार केल्याने त्यांची चौकशी करून त्यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे अशी मागणी माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्णे यांनी सचिव पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग मंत्रालय मुंबई, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नामदार पंकजा मुंडे पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय



मंत्री ,जिल्हा अधिकारी भंडारा, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद भंडारा, यांना पाठवलेल्या लेखी निवेदनातून केलेली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर पंचायत समितीचे पशुधन व दुग्ध व्यवसाय अधिकारी यांनी पुरवठा द्वारा सोबत संगणमत करून सन 2018 ते 19 2025 26 या कालावधीत 118 लाभार्थ्यांपैकी 81 लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ न देता कागदोपत्री लाभार्थ्यांना लाभ दिल्याचे दाखवून 11 कोटी ,तीन लाख ,40 हजार रुपयांचा गैरव्यवहार करून शासनाची व लाभार्थ्यांची फसवणूक केली आहे. शासनाला फलश्रुती अहवाल कोठे सादर करून शासनाची दिशाभूल केली आहे माहितीच्या अधिकारात माहिती विचारली असता 118 लाभार्थ्यांना लाभ दिले असून 81 लाभार्थ्यांकडे प्रत्यक्ष जनावरे उपलब्ध नसल्याचे तालुका व पशु संवर्धन व दुग्ध व्यवसाय अधिकारी पंचायत समिती नाकांदूर यांनी जा क्र/पंसला / तापवदुअ/आस्था 221/2026 दिनांक 30/3/2026 व जा . क्र.222/2026 दिनांक 31/3/2026 या पत्राद्वारे कळविण्यात. आले आहे. तालुका पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय अधिकारी पंचायत समिती लाखांदूर यांनी शासनाला पाठविलेल्या फलश्रुती अहवालात दूध उत्पादन व उत्पादनात झालेली वाढ सादर केली असून तो अहवाल पूर्णता खोटा आहे. सन 2018 -19 ह्या वर्षात 13 लाभार्थ्यांचे प्रतिदिन 95 लिटर दूध उत्पन्न दाखविले असून 85000 उत्पादनात वाढ झाल्याचे अहवालात नमूद आहे. मात्र सण 2018- 19 या वर्षातील 13 लाभार्थ्यांपैकी एकही लाभार्थ्यांकडे जनावरे उपलब्ध नाहीत, सन 2019 -20 वर्षातील 11 लाभार्थ्यांपैकी 8 लाभार्थ्यांकडे जनावरे नाहीत, सन 2020 -21 वर्षातील 12 लाभार्थ्यांपैकी 8 लाभार्थ्यांकडे जनावरे नाहीत ,सन 2021- 22 वर्षात 17 लाभार्थ्यांपैकी 12 लाभार्थ्यांकडे जनावरे नाहीत, सन 2023 -24 वर्षातील 21 लाभार्थ्यांपैकी 14 लाभार्थ्यांकडे जनावरे नाहीत, सन 2024 -25 वर्षातील 12 लाभार्थ्यांपैकी 9 लाभार्थ्यांकडे जनावरे नाहीत, सन 2025- 26 वर्षातील 32 लाभार्थ्यांपैकी 17 लाभार्थ्यांकडे जनावरे नाहीत, सन 2018 19 ते 2024 25 या वर्षात पशुसंवर्धन विभागाने कल श्रुती अहवालात एकूण उत्पादनात 13 लाख 17 हजार 240 एवढे दूध उत्पादन होत असल्याचे शासनास कळविले आहे. मात्र प्रत्यक्ष 188 लाभार्थ्यांपैकी 81 लाभार्थ्यांकडे जनावरे उपलब्ध नाहीत. केवळ 37 लाभार्थ्यांकडे जनावरे आहेत मग हा दूध कुठून आले व कोणत्या डेरीत विकण्यात आले याची सुद्धा चौकशी करण्यात यावी. लाभार्थ्यांना लाभ देण्यापूर्वी लाभार्थ्यांची आवश्यक कागदपत्राची पडताळणी करावी तसेच लाभार्थ्याने इतर योजनेत लाभ घेतला नसल्याची खात्री करावी त्यानंतरच सदर योजनेचा लाभ देण्यात यावा त्यांनी इतर योजनेचा लाभ घेतला असल्यास व त्या लाभार्थ्यास आपण लाभ दिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकाऱ्याची राहील अशी लेखी सूचना असून सुद्धा पशुसंवर्धन अधिकारी लाखांदूर यांनी एकाच व्यक्तीला दोनदा तीनदा लाभ दिल्याचे कागदपत्रे दाखवून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केलेला आहे.

सदतीस लाभार्थ्यांना दुबार योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे त्यामुळे वरील गंभीर प्रकरणाची चौकशी करून संबंधित अधिकारी व पुरवठादार यांच्यावर कारवाई करावी व सदर योजनेच्या गैरप्रकारात जेवढ्या पैशाचा गैरव्यवहार करण्यात आले आहे ते सर्व संबंधित कर्मचारी व पुरवठादार यांच्याकडून वसूल करण्यात यावी असे मागणी सुद्धा भंडारा जिल्हा परिषदचे माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्णे यांनी केलेली आहे.

# बौद्धिक संपदा : नवसर्जनाचे संरक्षक छत्र

दरवर्षी २६ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगात 'जागतिक बौद्धिक संपदा दिन' म्हणून साजरा केला जातो आणि हा दिवस मानवी सर्जनशीलतेच्या सामर्थ्याचा, ज्ञाननिर्मितीच्या प्रक्रियेचा आणि नवोन्मेषाच्या प्रवाहाचा उत्सव म्हणून ओळखला जातो. मानवी सभ्यतेच्या उत्क्रांतीचा मागोवा घेतला असता असे स्पष्टपणे दिसून येते की, मानवाने आपल्या बुद्धीच्या, कल्पनाशक्तीच्या आणि सर्जनशीलतेच्या बळावरच समाज, संस्कृती, विज्ञान आणि तंत्रज्ञानाची उभारणी केली आहे. या सर्व प्रक्रियेतून निर्माण होणारी बौद्धिक संपदा ही केवळ एखाद्या व्यक्तीची वैयक्तिक मालमत्ता नसून ती समाजाच्या प्रगतीची पायाभूत शक्ती आहे. त्यामुळे या संपदेचे संरक्षण, संवर्धन आणि योग्य व्यवस्थापन करणे ही आधुनिक काळातील अत्यंत महत्त्वाची गरज ठरते.

'बौद्धिक संपदा' ही संकल्पना मूलतः मानवी बुद्धिमत्तेने साकारलेल्या निर्मितींशी संबंधित आहे. साहित्य, संगीत, चित्रकला, शिल्पकला, वैज्ञानिक संशोधन, तांत्रिक शोध, औद्योगिक डिझाईन्स, व्यापारचिन्हे, भौगोलिक संकेत अशा विविध स्वरूपांमध्ये बौद्धिक संपदेचे अस्तित्व आढळते. या सर्व निर्मितींमध्ये सर्जनशीलता, मौलिकता आणि नवोन्मेष यांचे दर्शन घडते. या निर्मितींचे कायदेशीर संरक्षण करण्यासाठी विविध प्रकारचे बौद्धिक संपदा हक्क अस्तित्वात आले आहेत. कॉपीराइट, पेटंट, ट्रेडमार्क, औद्योगिक डिझाईन, भौगोलिक संकेत हे त्यातील प्रमुख प्रकार होत. या हक्कांमुळे सर्जकाला त्याच्या निर्मितीवर विशिष्ट कालावधीसाठी मालकी हक्क प्राप्त होतो आणि त्यातून आर्थिक व सामाजिक लाभ मिळवण्याची संधी उपलब्ध होते.

जागतिक बौद्धिक संपदा दिन साजरा करण्यामागील उद्दिष्ट केवळ या संकल्पनेची माहिती देणे एवढ्यावर मर्यादित नाही, तर सर्जनशीलतेचा सन्मान करणे, नवोन्मेषाला प्रोत्साहन देणे आणि निर्मात्यांच्या हक्कांविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे हेही त्यामागील महत्त्वाचे हेतू आहेत. या दिवसाच्या निमित्ताने विविध देशांमध्ये शैक्षणिक संस्था, संशोधन केंद्रे, उद्योगसंस्था आणि शासन यांच्याद्वारे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. या कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांना, संशोधकांना आणि सामान्य नागरिकांना बौद्धिक संपदेचे महत्त्व समजावून सांगितले जाते. विशेषतः तरुण पिढीमध्ये नवकल्पनांची प्रेरणा निर्माण करणे आणि त्यांना त्यांच्या कल्पनांचे संरक्षण करण्याबाबत मार्गदर्शन करणे ही या उपक्रमांची मुख्य उद्दिष्टे असतात.

आजच्या जागतिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानाच्या झपाट्याने बदलणाऱ्या युगात बौद्धिक संपदेचे महत्त्व अधिकच अधोरेखित होते. माहिती तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, औषधनिर्मिती, कृत्रिम बुद्धिमत्ता, नॅनोतंत्रज्ञान अशा क्षेत्रांमध्ये सतत नवीन संशोधन होत आहे. या संशोधनातून निर्माण होणाऱ्या नवकल्पना आणि शोध यांचे संरक्षण करण्यासाठी बौद्धिक संपदा हक्कांची आवश्यकता अनिवार्य ठरते. एखाद्या संशोधकाने अथवा संस्थेने मोठ्या परिश्रमाने आणि गुंतवणुकीने तयार केलेल्या शोधाचे संरक्षण नसेल, तर त्या शोधाचा गैरवापर होण्याची शक्यता निर्माण होते आणि त्यामुळे संशोधनाची प्रेरणा कमी होऊ शकते. म्हणूनच बौद्धिक संपदा हक्क हे नवोन्मेषासाठी प्रोत्साहन देणारे महत्त्वाचे साधन मानले जाते.

आर्थिक दृष्टीकोनातून पाहता, बौद्धिक संपदा ही आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. ज्ञानाधारित उद्योगांमध्ये बौद्धिक संपदेचे मूल्य प्रचंड असते. सॉफ्टवेअर उद्योग, मनोरंजन क्षेत्र, औषधनिर्मिती उद्योग, फॅशन उद्योग अशा विविध क्षेत्रांमध्ये बौद्धिक संपदेचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. या क्षेत्रांमध्ये निर्माण होणाऱ्या उत्पादनांचे आणि सेवांचे मूल्य त्यांच्या सर्जनशीलतेवर आणि नवोन्मेषावर अवलंबून असते. त्यामुळे या क्षेत्रांतील कंपन्या त्यांच्या बौद्धिक संपदेचे संरक्षण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करतात. यामुळे आर्थिक विकासाला गती मिळते आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळते.

सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही बौद्धिक संपदेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्रत्येक समाजाची एक वेगळी सांस्कृतिक ओळख असते आणि ही ओळख त्या समाजाच्या परंपरा, कला, साहित्य, लोकसंस्कृती यांमध्ये प्रतिबिंबित होते. या सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करणे हे देखील बौद्धिक संपदा व्यवस्थेचे एक महत्त्वाचे कार्य आहे. विशेषतः भौगोलिक संकेतांच्या माध्यमातून एखाद्या विशिष्ट प्रदेशातील उत्पादनांची ओळख जपली जाते. उदाहरणार्थ, एखाद्या प्रदेशातील हस्तकला, खाद्यपदार्थ किंवा कृषी उत्पादने यांना त्यांच्या विशिष्ट वैशिष्ट्यांमुळे विशेष दर्जा प्राप्त होतो आणि त्याचे संरक्षण केले जाते. यामुळे त्या प्रदेशातील कारागीर, शेतकरी आणि उत्पादक यांना आर्थिक लाभ मिळतो आणि त्यांच्या पारंपरिक ज्ञानाचे जतन होते.

तथापि, बौद्धिक संपदा हक्कांच्या अंमलबजावणीमध्ये अनेक आव्हानेही निर्माण झाली आहेत. विशेषतः डिजिटल युगात माहितीचे आदानप्रदान अत्यंत सुलभ झाले आहे. इंटरनेटच्या माध्यमातून साहित्य, संगीत, चित्रपट, सॉफ्टवेअर यांची सहज देवाणघेवाण होत असल्यामुळे कॉपीराइट उल्लंघनाच्या घटना मोठ्या प्रमाणावर वाढल्या आहेत. पायरेटसी, नकली उत्पादने, ट्रेडमार्कचे उल्लंघन या समस्या आज जागतिक स्तरावर गंभीर बनल्या आहेत. या समस्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर कायदे, प्रभावी अंमलबजावणी आणि जनजागृती आवश्यक आहे.

भारतातील संदर्भात बौद्धिक संपदेचे महत्त्व विशेषत्वाने अधोरेखित होते. भारत हा सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध आणि विविधतेने नटलेला देश आहे. येथे प्राचीन काळापासून विविध प्रकारचे पारंपरिक ज्ञान आणि कौशल्य विकसित झाले आहे. आयुर्वेद, योग, पारंपरिक औषधपद्धती, हस्तकला, लोककला, कृषी पद्धती या क्षेत्रांमध्ये भारताची समृद्ध परंपरा आहे. या पारंपरिक ज्ञानाचे संरक्षण करणे आणि त्याचा योग्य उपयोग करणे ही आजची गरज आहे. भौगोलिक संकेतांच्या माध्यमातून या परंपरांचे संरक्षण केले जाऊ शकते आणि त्यातून स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते.

शैक्षणिक क्षेत्रात बौद्धिक संपदेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. उच्च शिक्षण संस्थांमध्ये संशोधन आणि विकास यांना प्रोत्साहन देण्यासाठी बौद्धिक संपदा हक्कांची माहिती विद्यार्थ्यांना दिली जाते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आणि नवोन्मेषाची वृत्ती विकसित होते. तसेच, संशोधनातून निर्माण होणाऱ्या निष्कर्षांचे संरक्षण करून त्यांचा समाजहितासाठी उपयोग केला जाऊ शकतो. विद्यापीठे आणि संशोधन संस्था यांच्यामार्फत पेटंट्स, कॉपीराइट्स आणि इतर बौद्धिक संपदा हक्क मिळवण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

नैतिक दृष्टिकोनातून पाहता, बौद्धिक संपदेचा आदर करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. एखाद्या व्यक्तीच्या श्रमांचे आणि सर्जनशीलतेचे योग्य मूल्यांकन करणे हे सामाजिक न्यायाच्या तत्त्वाशी सुसंगत आहे. जेव्हा आपण इतरांच्या निर्मितीचा विनापरवानगी वापर करतो, तेव्हा आपण त्या व्यक्तीच्या अधिकारांचे उल्लंघन करतो. त्यामुळे बौद्धिक संपदेबाबत समाजात संवेदनशीलता निर्माण करणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या माध्यमातून ही जाणीव वाढवता येऊ शकते.

डिजिटल युगात बौद्धिक संपदेच्या स्वरूपात मोठे बदल होत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, बिग डेटा यांसारख्या तंत्रज्ञानामुळे नवीन प्रकारच्या सर्जनशीलतेचा उदय होत आहे. या नव्या परिस्थितीत बौद्धिक संपदा हक्कांच्या व्याख्या आणि अंमलबजावणी यामध्ये बदल करण्याची गरज निर्माण झाली आहे. उदाहरणार्थ, कृत्रिम बुद्धिमत्तेने निर्माण केलेल्या कलाकृतींचे हक्क कोणाला द्यायचे, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. या संदर्भात जागतिक स्तरावर चर्चा सुरू आहे.

भारत सरकारने बौद्धिक संपदेच्या क्षेत्रात विविध धोरणे आणि योजना राबविल्या आहेत. स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यासाठी, संशोधनाला चालना देण्यासाठी आणि नवोन्मेषाला समर्थन देण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. 'स्टार्टअप इंडिया', 'मेक इन इंडिया' यांसारख्या उपक्रमांमुळे तरुण उद्योजकांना संधी उपलब्ध होत आहे. यामुळे देशात नवकल्पनांचे वातावरण निर्माण होत आहे आणि आर्थिक विकासाला चालना मिळत आहे.

तथापि, बौद्धिक संपदा हक्कांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अजूनही अनेक पावले उचलण्याची आवश्यकता आहे. विशेषतः ग्रामीण भागात आणि लघुउद्योगांमध्ये या हक्कांबाबत जागरूकता कमी आहे. त्यामुळे या क्षेत्रांमध्ये जनजागृती कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. तसेच, न्यायालयीन प्रक्रिया सुलभ करणे, तक्रारींचे जलद निवारण करणे आणि तांत्रिक सुविधा उपलब्ध करून देणेही गरजेचे आहे.

जागतिक बौद्धिक संपदा दिन हा सर्जनशीलतेचा, नवोन्मेषाचा आणि ज्ञानाचा उत्सव आहे. या दिवसाच्या निमित्ताने आपण आपल्या समाजात बौद्धिक संपदेचा आदर करण्याची संस्कृती विकसित केली पाहिजे. सर्जकांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि नवकल्पनांना चालना देणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. यामुळेच समाजाच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल आणि ज्ञानाधारित अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल.

अखेर, बौद्धिक संपदा ही मानवाच्या प्रगतीचा मूलाधार आहे. तिचे संरक्षण आणि संवर्धन केल्याशिवाय शाश्वत विकास साध्य होऊ शकत नाही. त्यामुळे जागतिक बौद्धिक संपदा दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी सर्जनशीलतेचा सन्मान करण्याचा, नवोन्मेषाला प्रोत्साहन देण्याचा आणि बौद्धिक संपदेच्या संरक्षणासाठी सक्रिय भूमिका घेण्याचा संकल्प केला पाहिजे. हीच या दिवसाची खरी उपयुक्तता आणि महत्ता आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# राजस्थानच्या गावांनाही मधुमेहाचा विळखा? डॉ. राकेश पारिख यांनी दिला धोक्याचा इशारा

गेल्या काही वर्षांत मधुमेह हा एक झपाट्यानं वाढणारा आजार म्हणून समोर आला आहे. पूर्वी शहरी जीवनशैलीशी संबंधित असलेला हा आजार आता राजस्थानच्या गावांमध्ये वेगानं पसरत आहे. राज्यातील एक प्रसिद्ध मधुमेह तज्ज्ञ डॉ. राकेश पारिख यांच्या मते, भारतातील मधुमेहातील या जलद वाढीमागं प्रामुख्यानं बदलती जीवनशैली, असंतुलित खाण्याच्या सवयी, वाढलेला ताण आणि शारीरिक हालचालींचा अभाव ही कारणं आहेत. गेल्या काही वर्षांत राजस्थानमध्येही मधुमेह रुग्णांच्या संख्येत वाढ दिसून आली आहे.

**कमी वयात वाढतय आजारांचं प्रमाण :** "पूर्वी मधुमेहाचे रुग्ण शहरांमध्ये अधिक प्रमाणात आढळत होते. पण आता ग्रामीण भागातही रुग्णांची संख्या झपाट्यानं वाढत आहे. ग्रामीण भागात जनजागृती आणि तपासणीच्या अभावामुळं या आजाराचं निदान अनेकदा उशिरा होतं. पूर्वी हा आजार सुमारे 50 वर्षे वयाच्या रुग्णांमध्ये अधिक प्रमाणात आढळत होता. पण आता २५-३५वयोगटातील तरुणांमध्येही मधुमेहाचं प्रमाण वाढल्याचं दिसून येत आहे. लठ्ठपणा हे मधुमेहाचं एकमेव कारण नाही. आनुवंशिकता, चुकीच्या खाण्याच्या सवयी आणि इन्सुलिन प्रतिरोध यांसारख्या घटकांमुळं बारीक लोकसुद्धा मधुमेहाचे बळी ठरत आहेत. दक्षिण भारताच्या तुलनेत राजस्थानमध्ये तूप आणि मिठाईचा वापर जास्त होतो. जर यांचं सेवन प्रमाणात केलं नाही, तर मधुमेहाचा धोका वाढू शकतो, ," अशी माहिती डॉ. पारिख यांनी दिली.

**शहरीकरणाचा परिणाम :** "वेगवान शहरीकरणामुळं लोकांच्या दैनंदिन दिनचर्या बदलल्या आहेत. चालणं कमी झालं आहे, बाहेरचं खाणं आणि बैठं काम वाढलं आहे. यामुळं मधुमेहाचा धोका निर्माण झाला आहे. याशिवाय, पॅक केलेलं अन्न, कमी झालेली शारीरिक हालचाल आणि मोबाईल फोनचा वाढता वापर ग्रामीण भागातील मधुमेहाच्या रुग्णांमध्ये वाढ होण्यास हातभार लावत आहे," असं डॉ. पारिख यांनी सांगितलं.

**चुकीची जीवनशैली हे सर्वात मोठं कारण :** "जेव्हा उपचारासाठी रुग्णांशी बोलतो तेव्हा लक्षात येतं की बहुतेकांची जीवनशैली



चुकीची असते. रात्री उशिरापर्यंत जागं राहणं, जंक फूड खाणं, व्यायामाचा अभाव आणि तणाव यांसारख्या सवयी रुग्णांमध्ये सामान्यपणे आढळतात. त्यामुळं राजस्थानसारख्या उष्ण आणि कोरड्या हवामानाच्या प्रदेशात लोकांनी पुरेसं पाणी पिणं, हलका आहार घेणं आणि नियमित व्यायाम करणं महत्त्वाचं आहे," असं डॉ. पारिख यांनी सांगितलं.

**तपासणीचा अभाव चिंतेची बाब :** "राजस्थानमध्ये नियमित आरोग्य तपासणीचं प्रमाण अजूनही कमी आहे. रक्तातील साखरेची नियमित तपासणी केल्यास आजार सुरुवातीच्या टप्प्यातच ओळखण्यास मदत होऊ शकते. मधुमेहाचा थेट संबंध हृदयरोग, मूत्रपिंड निकामी होणं आणि डोळ्यांच्या समस्यांशी निगडीत आहे. जर त्यावर दीर्घकाळ नियंत्रण ठेवलं नाही, तर तो गंभीर रूप धारण करू शकतो, अशी माहिती डॉ. पारिख यांनी दिली.

**नवीन तंत्रज्ञानामुळं सोपं नियंत्रण :** "गेल्या काही वर्षांत मधुमेहाच्या उपचारात लक्षणीय प्रगती झाली आहे. कंटीन्युअस ग्लुकोज मॉनिटरिंग (CGM) सारखं तंत्रज्ञान रुग्णांना त्यांच्या रक्तातील साखरेच्या पातळीवर लक्ष ठेवण्यास मदत करत आहे. रुग्ण त्यांच्या रक्तातील साखरेच्या पातळीवर सतत लक्ष ठेवू शकतात. शिवाय, आता प्रगत औषधांद्वारे मधुमेहावर नियंत्रण मिळवता येते, असं डॉ. पारिख यांनी सांगितलं.

**मधुमेह प्रतिबंधात सरकार, शाळा आणि कार्यस्थळांची महत्त्वाची भूमिका :** "देशात झपाट्यानं वाढणाऱ्या मधुमेहाच्या रुग्णसंख्येला आळा घालण्यासाठी सरकार, शाळा आणि कार्यस्थळांची भूमिका अत्यंत महत्त्वाची झाली आहे. सरकार जनजागृती मोहीम, आरोग्यदायी आहार धोरणं आणि नियमित आरोग्य तपासणी राबवू शकते. शाळा मुलांना संतुलित आहार आणि शारीरिक हालचालींबद्दल शिक्षित करू शकतात. कार्यस्थळांनी देखील फिटनेस कार्यक्रम, आरोग्यदायी कॅफेटेरिया आणि तणाव व्यवस्थापन उपक्रमांना प्रोत्साहन दिलं पाहिजे. या जीवनशैलीजन्य आजारावर प्रभावी नियंत्रण केवळ सामूहिक प्रयत्नांतूनच शक्य आहे," अशी माहिती डॉ. पारिख यांनी दिली.

**मधुमेह रुग्णांनी साखर पूर्णपणे सोडावी का? :** "मधुमेह रुग्णांनी साखर पूर्णपणे सोडणं आवश्यक नसलं तरी, साखरेच्या सेवनावर काटेकोरपणे नियंत्रण ठेवणं अत्यंत महत्त्वाचं आहे. अतिरिक्त साखरेमुळं रक्तातील ग्लुकोजची पातळी झपाट्यानं वाढते. त्यामुळं गुंतागुंत निर्माण होऊ शकते. यामुळं रुग्णांना मिठाई, गोड पेये आणि प्रक्रिया केलेले पदार्थ टाळण्याचा सल्ला दिला जातो. नैसर्गिक साखर असलेली फळं मर्यादित प्रमाणात खाल्ली जाऊ शकतात. संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार औषधोपचार घेणं हे मधुमेह नियंत्रणात ठेवण्याचे सर्वोत्तम मार्ग मानले जातात," असं डॉ. पारिख यांनी सांगितलं.

**बारीक लोकांनाही मधुमेह का होतोय? :** "मधुमेह हा सहसा लठ्ठपणाशी संबंधित आजार मानला जातो. पण आता बारीक लोकांनाही त्याचा धोका वाढत आहे. याची मुख्य कारणं म्हणजे आनुवंशिकता, चुकीचा आहार, शारीरिक हालचालींचा अभाव आणि ताणतणाव. बऱ्याच प्रकरणांमध्ये, शरीर इन्सुलिन योग्यरित्या तयार करू शकत नाही किंवा वापरू शकत नाही. त्यामुळं रक्तातील साखरेचं प्रमाण वाढतं. केवळ वजनच नाही, तर जीवनशैली आणि नियमित आरोग्य तपासणी देखील हा आजार टाळण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात," अशी माहिती डॉ. पारिख यांनी दिली.

**रुग्णांमध्ये कोणत्या जीवनशैलीच्या सवयींमुळं मधुमेह होण्याची शक्यता सर्वाधिक? :** क्लिनिकमध्ये येणाऱ्या बहुतेक मधुमेही रुग्णांमध्ये काही विशिष्ट जीवनशैलीच्या सवयी आढळतात. यामुळं हा आजार वाढतो. यामध्ये शारीरिक हालचालींचा अभाव, जंक फूड आणि साखरयुक्त पेयांचं अतिसेवन, अनियमित झोप आणि सततचा ताण यांचा समावेश आहे. दीर्घकाळ बसून राहणं हे देखील एक प्रमुख कारण आहे. या सवयींमुळं शरीरातील इन्सुलिनच्या निर्मितीवर परिणाम होतो, असं डॉ. पारिख यांनी सांगितलं.